नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १७१ * * अमरावती * बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## महाराष्ट्रासह २१ ठिकाणी ईडीची छापेमारी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली,, दि. २३ :**
क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करून मोठ्या नफ्याचे आमिष दाखवून भारत आणि परदेशातील लोकांना कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पदार्फाश करण्यात आला आहे. अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) बेंगळुरू झोनल ऑफिसने मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) कर्नाटक, महाराष्ट्र आणि दिल्लीतील २१ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. मेसर्स फोर्थ ब्लॉक कन्सल्टंट्स आणि त्यांच्या सहयोगींविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. कर्नाटक पोलिसांच्या एफआयआर आणि त्यांच्याशी संबंधित माहितीच्या आधारे ईडीला ही माहिती मिळाली.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## मुंबापुरीचे पांग कसे फेडणार!

आता मुंबई महानगरपालिकेच्या अटीतटीच्या लढती होणार आहेत. अजून तरी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या वाटपाचा तिढा पूर्णपणे सुटलेला नाही. त्यातच आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या मनोमिलनाच्या घोषणेनंतर त्यांनाही जागा वाटपासाठी एकवाक्यता करावी लागेल. काँग्रेस सध्या तरी एकला चलो म्हणून एकहाती लढण्याच्या घोषणा करत आहे. निवडणूक आली की प्रत्येकालाच आपली ताकद प्रचंड वाढल्याचा साक्षात्कार होतो, बोलणी होतात आणि बोलणी फिस्कटतात हा क्रम सतत सुरू असतो. वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसचा शिवाशिवीचा खेळ महाराष्ट्राने अनेकदा अनुभवलेला आहे वंचित जेवढ्या जागा मागतात तेवढ्या काँग्रेस देत नाही. काँग्रेस पुढे सरकत नाही आणि वंचित मागे हटत नाही. हे काहीही असले तरी युती आणि आघाडी यांच्यातील फाटाफूट अटळ आहे. भारतीय जनता पक्ष क्रमांक एकचा राहील असाच त्यांचा ठाम विश्वास आहे सोबत धनुष्यबाणाची शिवसेना असल्यावर आपला विजय पक्का आहे असे भारतीय जनता पक्षाला वाटणे स्वाभाविक आहे. याचा उहापोह आम्ही आधीच केलेला आहे आज वंचित बहुजन आघाडीने काँग्रेस यांचे मनोमिलन होते की नाही हाच एक मात्र विषय होता, तरी तसे होताना दिसून येत नाही. ठाकरे बंधूंनी मराठीचा मुद्दा पुढे करून दोघांनी एकत्र येऊन लढण्याचे ठरवलेले आहे मुंबईत मराठीचा टक्का किती आहे याचे गणित लावले आणि उदार मनाने विचार केला तरी मुंबईत मराठी माणूस पस्तीस ते चाळीस टक्के पेक्षा जास्त नाही ही वस्तुस्थिती आहे. ही सर्व मराठी माणसे उद्धव आणि राज यांच्याबरोबर असतील असेही नाही. मराठीच्या मुद्द्याबरोबर इतर अनेक मुद्दे या निवडणुकीत चर्चिले जात आहेत. खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसबरोबर चर्चा करून महाविकास आघाडीने एकत्रित लढावे असे म्हटले आहे. मात्र काँग्रेस या गोष्टीला तयार नाही याचा महत्त्वाचा अर्थ असा की काँग्रेसला कोणाबरोबरही चर्चा करायची नाही. काँग्रेसचे नेते कशाच्या आधारावर हा निर्णय घेत आहेत हे त्यांचे त्यांना ठाऊक, पण एकूण जी परिस्थिती दिसते त्यात युती सरकारमधील अजित पवार यांची राष्ट्रवादी मुंबईत युतीबरोबर दिसणार नाही हे पक्के झालेले आहे. या सर्व बेरजा वजाबाक्या करून भारतीय जनता पक्षाने सर्व प्रकारे जबरदस्त तयारी केलेली दिसते. हा पक्ष ज्या आवेगाने निवडणूक लढवतो तो आवेग इतर कोणताही पक्ष दाखवीत नाही हे उघड आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी या दोघांच्या वाटा वेगवेगळ्या झाल्या आहेत. वंचित बहुजन आघाडीने लोकसभेत मागितलेल्या जागा आघाडीला देता आल्या नव्हत्या. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे निदान दोन ते तीन खासदार निवडून येण्याचे मनोरे आततयी मागणीमुळे ढासळले. विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचेच तीन तेरा वाजले तिथे इतरांची कथाच काय. आता चार-पाच दिवस बाकी आहेत या चार-पाच दिवसात कोणाकोणाची युती, कोणा कोणाची आघाडी होते यावर मुंबईकरांचे लक्ष केंद्रित झालेले आहे. कार्यकर्ते, नेते, धन आणि इतर अनेक बाबतीत भारतीय जनता पक्ष महाश्रीमंत आहे काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यामुळे अनेकांची समीकरणे बिघडणार आहेत. न्यायालयात खरी शिवसेना कोणाची याचा निकाल लागणेही जवळपास अशक्य झालेले दिसते. आता मुंबईकर कोणाला निवडून देतात हेही अजून तरी गुलदस्त्यात आहे. कोणीही निवडून येवो मुंबईकरांना चांगले रस्ते, उत्तम पर्यावरण यासह मुबलक वापराचे आणि पिण्याचे शुद्ध पाणी याचीच अपेक्षा असते. मुंबईच्या रहदारीच्या प्रचंड गर्दीत फिरण्यासाठी जो वेळ जातो तो वाचावा असेही मुंबईकरांना वाटते. सर्वपक्षीय नेत्यांना मुंबईच्या काळजीपेक्षा आपापल्या पक्षाची जास्त काळजी वाटते हे खरे आहे. बिचारी मुंबई नव्या मालकाकडे आशेने बघत आहे. सत्तेवर कोणीही येवो, मुंबापुरीचे पांग कसे फेडणार!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## मनपा निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास

# राज्यभरात लगबग!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई/नागपूर, दि. २३ :**
मुंबईसह राज्यभरातील महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीतील सर्वात निर्णायक टप्प्याला आजपासून सुरुवात झाली असून, इच्छुक उमेदवारांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आज (ता. २३) पासून सुरू झाली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार २३ ते ३० डिसेंबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. मात्र २५ डिसेंबर (ख्रिसमस) आणि २८ डिसेंबर (रविवार) या दिवशी अर्ज प्रक्रिया बंद राहणार असल्याने उमेदवारांकडे कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मर्यादित वेळ उरला आहे.




येत्या ३१ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होणार असून, २ जानेवारीपर्यंत माघार घेण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर निवडणूक प्रचाराला खऱ्या अर्थाने वेग येणार असून, १५ जानेवारीला मतदान होत आहे. त्यामुळे आजपासून मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

**पक्ष गप्प, इच्छुक आक्रमक!**
महायुती, ठाकरे बंधूंची युती, काँग्रेस-राष्ट्रवादीची महाविकास आघाडी किंवा इतर आघाड्या असोत, यापैकी अनेक पक्षांनी अधिकृत उमेदवार जाहीर केलेले नाहीत. मात्र, इच्छुक उमेदवार मैदानात उतरले आहेत. अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात झाली. अनेकांनी अर्ज खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

**बंडखोरीची भीती, पक्ष सावध**
पक्षाची अधिकृत उमेदवारी न मिळाल्यास अनेक इच्छुक बंडखोरी करून अपक्ष किंवा दुसऱ्या पक्षाकडून अर्ज दाखल करू शकतात, अशी भीती राजकीय पक्षांच्या गोटात आहे. त्यामुळेच पक्ष नेतृत्वाने अजूनही आपले पत्ते उघड केले नसल्याचे दिसून येते.

# ठरलं बुवा एकदाचं!

## ठाकरे बंधूंच्या युतीची १२ वाजता घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ :**
उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची घोषणा बुधवारी दुपारी १२ वाजता होणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी ही माहिती दिली.



राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झालीय. त्यातही उभ्या देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेसाठी भाजपने जोर लावला आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव आणि राज एकत्र आलेत.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी एक्स या सोशल मीडियावर एक ट्विट केले आहे. त्यात फक्त तीन शब्दांत आपले नेमके म्हणणे मांडले आहे. 'उद्या १२ वाजता' असे वाक्य लिहून त्यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांच्या एक फोटो ट्विट केला. सोबतच त्यांनी एक फोटो सुद्धा जोडला आहे.

उद्या दुपारी १२ वाजता हॉटेल ब्लू सी वरळी असा उल्लेख केला आहे. त्यामुळे ठाकरे बंधू या हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेऊन युतीची घोषणा करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## विजय मल्ल्याने भारतात परत यावे

याचिकेवर सुनावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :**
फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याने भारतात परत यावे. तो भारतात आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून त्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू करण्यात येईल, अशी स्पष्ट भूमिका मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केली.

न्यायालयाने मल्ल्याच्या वकिलांना ही सूचना पुन्हा एकदा देत, एकाचवेळी दाखल केलेल्या दोन्ही याचिकांवर सुनावणी होणार नसल्याचेही ठणकावून सांगितले. यापैकी एक याचिका मागे घ्यावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट करताच मल्ल्याचे वकील अमित देसाई यांनी भूमिकेवर निर्णय घेण्यासाठी वेळ मागून घेतला.

न्यायालयाने पुढील सुनावणीत स्पष्ट भूमिका मांडण्याचे निर्देश देत या प्रकरणाची सुनावणी १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तहकूब केली आहे.

## किडनी विक्री प्रकरणातील आरोपीला

# सोलापुरातून अटक

एजंट 'डॉ. कृष्णा' निघाला इंजिनिअर

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. २३ :**
संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडविणाऱ्या चंद्रपूरमधील किडनी विक्री प्रकरणात विशेष तपास पथकाला मोठे यश मिळाले आहे. पीडित रोशन कुडे याला कंबोडियात किडनी विक्रीसाठी प्रवृत्त करणारा एजंट 'डॉ. कृष्णा' पोलिसांच्या ताब्यात आला आहे.

तो सोलापूरचा रहिवासी असून, 'डॉ. कृष्णा' या बनावट नावाने लोकांना फसवत होता. आरोपीचे खरे नाव मल्लेश आहे आणि तो डॉक्टर नसून इंजिनिअर आहे. धक्कादायक बाब म्हणजे त्याने स्वतःचीही किडनी विकली आहे. या प्रकरणातील पीडितांची संख्या वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुक्काम सुदर्शन यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. आरोपी मल्लेश ने आतापर्यंत दहा ते बारा जणांना किडनी विकण्यास मदत केली असल्याचे तपासात समोर आले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील रोशन कुडे या शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी कंबोडियात किडनी विकली. फेसबुकवरील 'किडनी डोनर कम्युनिटी' या पेजच्या माध्यमातून तो एका व्यक्तीच्या संपर्कात आला. आपण चेन्नई येथील असून व्यवसायाने डॉक्टर असल्याचे त्याने कुडे याच्या गळी उतरविले, त्यानंतर 'डॉ. कृष्णा' आणि कुडे व्हॉट्सॲप चॅटच्या माध्यमातून संपर्कात होते.

आठ लाख रुपयांत किडनी विकण्याचा निर्णय झाल्यानंतर कंबोडियाला जाण्यापूर्वी कोलकता विमानतळावर या दोघांची पहिली आणि शेवटची भेट झाली. किडनी विक्री प्रकरणात सहा सावकारांविरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर खळबळ उडाली. त्यानंतर मानवी अवयवांची तस्करीच्या दिशेने तपास सुरू झाला.

मुख्य आरोपी हाती लागले नव्हते. मात्र, 'डॉ. कृष्णा'ला सोलापुरात रात्री उशिरा अटक करण्यात आली. तपासात 'डॉ. कृष्णा' हे त्याचे बनावट नाव असल्याचे समोर आले. तो व्यवसायाने इंजिनिअर असल्याचे समजते. त्याने कपड्याचा व्यवसायही केला. मात्र, त्याचा हा व्यवसाय बुडाला. यातून त्याने स्वतःची किडनी विकली. त्याचे खरे नाव मल्लेश असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर तो किडनी विक्रीच्या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करू लागला. पोलिसांनी सोमवारी सोलापुरातून आरोपी मल्लेश ला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात आरोपिंची संख्या एकूण सात झाली असून सहा जणांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे.

## मुंबईत वंचितने मागितल्या

# फिफ्टी-फिफ्टी जागा

काँग्रेससमोर पेच

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ :**



मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असून, काँग्रेस एकटी पडण्याची शक्यता आहे. एकीकडे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले आहेत, तर दुसरीकडे राष्ट्रवादीला सोबत घेण्याची हालचाल सुरू आहे. अशा स्थितीत काँग्रेसने मुंबईत स्वबळाचा नारा दिला असला, तरी वंचित बहुजन आघाडीसोबत आघाडी करण्याची शक्यता अद्याप जिवंत आहे. मात्र, वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी फिफ्टीझफिफ्टी जागावाटपावर ठाम भूमिका घेतल्याने काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे.

आघाडीसोबत न जाता एकला चलो रे..ची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. तथापि, मुंबईत प्रभावी लढत उभारण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची साथ मिळावी, अशी अपेक्षा काँग्रेसकडून व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या चर्चांना आता प्रकाश आंबेडकरांच्या कडक अटींमुळे ब्रेक लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

मुंबई महापालिका निवडणुकीत ५० टक्के जागा वाटप मिळाल्याशिवाय आघाडी होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका प्रकाश आंबेडकरांनी मांडली आहे. महापालिकेत आमचे अस्तित्व आणि ताकद आम्ही दाखवून दिली आहे. मुंबईत २०० जागांवर लढण्याची आमची पूर्ण तयारी आहे,असे सांगत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.






## ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक

# विनोद कुमार शुक्ल यांचे निधन

■ **वृत्तसंस्था, रायपूर, दि. २३ :**



छत्तीसगडमधील प्रसिद्ध कवी, लघुकथाकार आणि कादंबरीकार विनोद कुमार शुक्ल यांचे मंगळवारी संध्याकाळी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. महिन्याभरापूर्वीच त्यांना भारतातील सर्वोच्च साहित्यिक सन्मान ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ते गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते आणि रायपूर एम्समध्ये उपचार घेत होते.

साहित्यकार विनोद कुमार शुक्ल यांना ज्ञानपीठचे महाव्यवस्थापक आर.एन. तिवारी यांनी देवी सरस्वतीची प्रतिमा आणि पुरस्काराचा धनादेश देऊन सन्मानित केले. ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते छत्तीसगडमधील पहिले साहित्यिक होते.

## बांगलादेशातील 'दिपू दास'च्या हत्येचे तीव्र पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :**
बांगलादेशात हिंदू समाजावर सुरू असलेले अत्याचार आणि तरुण दिपू चंद्र दास याची जमावाकडून झालेली निर्घृण हत्या, याच्या निषेधार्थ आज मुंबईत संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला.



विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने दक्षिण मुंबईतील कफ परेड परिसरात मंगळवारी जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

बांगलादेशातील मैमनसिंग येथील एका कारखान्यात काम करणाऱ्या २७ वर्षीय दिपू चंद्र दास या हिंदू युवकाची १८ डिसेंबर रोजी जमावाने अमानवी पद्धतीने हत्या केली होती. या घटनेमुळे जगभरातील हिंदूंमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या घटनेच्या निषेधार्थ मुंबईतील कफ परेड भागात विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत बांगलादेश सरकार आणि कट्टरपंथीयांविरोधात घोषणाबाजी केली.






## पुण्यात काका पुतण्याचे मनोमिलन?

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २३ :**



पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात महत्त्वाची हालचाल सुरू झाली असून, फुटलेली राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मविआघाडीसोबत मिळून निवडणूक लढवण्याबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहेत. आज झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून ॲड. वंदना चव्हाण, अंकुश काकडे, विशाल तांबे तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आमदार चेतन तुपे, शहराध्यक्ष सुनील टिंगरे आणि सुभाष जगताप सहभागी झाले होते.

या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढण्याबाबत अनुकूल वातावरण असल्याचे स्पष्ट झाले असून, एकत्र लढल्यास कोणत्या चिन्हावर निवडणूक लढवायची, याचा निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल.




# प्रशांत जगतापांचा राजीनामा माझ्याकडे आलेला नाही



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याच्या वृत्ताने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असतानाच, खासदार सुप्रिया सुळे यांनी यावर महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले आहे. "प्रशांत जगताप यांचा राजीनामा माज्याकडे आलेला नाही, त्यामुळे मला त्याबद्दल अधिकृत माहिती नाही," असे सांगत सुळे यांनी या राजीनामा नाट्यावर सस्पेन्स कायम ठेवला आहे. तसेच, २६ डिसेंबर रोजी दोन्ही राष्ट्रवादींची युती होणार असल्याच्या अजित पवारांच्या दाव्यावरही त्यांनी सावध प्रतिक्रिया दिली. प्रशांत जगताप यांच्या नाराजीबद्दल विचारले असता सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "राजीनामा द्यायचा असेल तर तो प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे जाणे अपेक्षित असते. मात्र, अद्याप तरी तसे काही घडल्याचे माज्या कानावर नाही. कालच मी स्वतः, जयंत पाटील आणि शशिकांत शिंदे यांनी प्रशांत जगताप यांच्याशी मुंबईत दोन तास सविस्तर चर्चा केली. महापालिका निवडणुकीत पक्षाचे धोरण काय असावे आणि समोर कोणते पर्याय आहेत, यावर आमचे सकारात्मक बोलणे झाले आहे." आमचा पक्ष लोकशाही पद्धतीने चालतो आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय होणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

### भाविकांना अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी आल्याचे आत्मिक समाधान मिळावे : मुख्यमंत्री

# नाशिक जिल्ह्यातील तीर्थ विकासासाठी मान्यता

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** नाशिक जिल्ह्यातील मालसाणे (ता. चांदवड) येथील जैन धर्मियांच्या णमोकार तीर्थ विकासासाठी 36 कोटी 35 लाख रकमेच्या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांमुळे भाविकांना येथे आल्यानंतर अध्यात्मासोबतच तीर्थस्थळी येण्याचे आत्मिक समाधान मिळावे अशा पद्धतीने कामे पूर्ण करावीत,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.



या ठिकाणी करण्यात येणारी कामे दर्जेदार असावी, कोणत्याही कामात तडजोड करण्यात येऊ नये. ही कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

या ठिकाणी 6 ते 25 फेब्रुवारी 2026 दरम्यान आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कामांमध्ये स्थायी स्वरूपातील 24 कोटी 26 लाख आणि महोत्सवाच्या आयोजनाकरिता 12 कोटी 9 लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे. बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, आमदार राहुल आहेर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, णमोकार तीर्थ येथे येणाऱ्या भाविकाला कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागू नये. संबंधित यंत्रणांनी सर्व सोयीसुविधा येथे भाविकांना उपलब्ध करून द्याव्यात. देश - विदेशातून येथे भाविक येणार असून येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाला या ठिकाणी येण्याचे समाधान मिळेल, अशा पद्धतीने महोत्सवाचे आयोजन करावे. महोत्सव आयोजनासाठी शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. स्वच्छतेसाठी असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावी. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा नियमित करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

या तीर्थाच्या विकासातून स्थानिक रोजगार निर्माण होणार आहे. त्या दृष्टीने विकास आराखडा राबविण्यात यावा. हे ठिकाण जैन धर्मियांचे राज्यातच नव्हे, तर देशात एक धार्मिक केंद्र म्हणून उदयास येईल. आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवासाठी देशभरातून 10 ते 15 लाख भाविक येतील. हा सोहळा यशस्वी करण्याचे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

बैठकीत नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे सादरीकरण केले. यावेळी अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, सचिव (नियोजन) शैला ए, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, णमोकार तीर्थचे पदाधिकारी उपस्थित होते.

णमोकार तीर्थ हे जैन धर्मस्थळ असून नाशिक - धुळे महामार्गावर मौजे मालसाणे गावाजवळ 40 एकरावर स्थित आहे. आराखडा अंतर्गत णमोकार तीर्थ क्रॉंकिट रस्ता तयार करणे, संरक्षक भिंत बांधकाम, नौकायन बांधकाम, हेलिपॅड, पार्किंग व्यवस्था, वीज पुरवठा, स्वच्छतेसाठी कामे करण्यात येणार आहे. या ठिकाणी 6 ते 25 फेब्रुवारी 2026 कालावधीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठान महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी पाण्याच्या टाक्या बसविणे, 450 युनिट टॉयलेट ब्लॉक उभारणी, विद्युतीकरण, सीसीटीव्ही, नियंत्रण कक्ष, तात्पुरती वैद्यकीय युनिट स्थापना करण्यात येणार आहे.

# राज्यातील ३ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** राज्यात नगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता आगामी महानगरपालिका निवडणुकांचे वेध लागले आहेत. या राजकीय रणधुमाळीच्या पार्श्वभूमीवर, राज्य प्रशासनाने आज तीन वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये ठाणे जिल्ह्याची कन्या डॉ. कश्मीरा संखे यांच्यासह शैला ए. आणि अरुण एम. या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

आज जाहीर झालेल्या आदेशानुसार, वित्त मंत्रालयातील सचिव (वित्तीय सुधारणा) म्हणून कार्यरत असलेल्या वरिष्ठ अधिकारी शैला ए. यांची आता मंत्रालयातील नियोजन विभागाच्या सचिव आणि विकास आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मूळच्या ठाणे जिल्ह्याच्या असलेल्या डॉ. कश्मीरा संखे यांची नाशिक जिल्ह्यातील 'आयटीडीपी' प्रकल्पावर सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे नाशिकमधील आदिवासी विकास प्रकल्पांना गती मिळण्याची शक्यता आहे. 2023 च्या बॅचचे अधिकारी अरुण एम. यांची गडचिरोली येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नक्षलग्रस्त भागात प्रशासकीय घडी बसवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल.

# अजित पवारांना महायुतीत राहण्याचा अधिकार नाही



**मुंबई :** राज्यातील नगरपालिका निवडणुकांचा टप्पा पार पडल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांनी आगामी महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. मुंबईत शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युतीचे संकेत मिळत असून, उद्याच त्यांचे जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे. या घडामोडींमुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, मुंबई महापालिकेवर वर्चस्व गाजवण्यासाठी ठाकरे बंधूंनी ही नवी रणनीती आखल्याचे दिसून येत आहे.

दुसरीकडे, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येण्याच्या हालचालींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार प्रहार केला आहे. अजित पवार यांचे नेते आता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह आहेत, त्यामुळे जर पुण्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत ते हातमिळवणी करणार असतील, तर त्यांना महायुतीत राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, असे राऊत यांनी ठणकावून सांगितले. तसेच, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास शिवसेना ठाकरे शरद पवारांच्या गटासोबत न जाता मनसे आणि काँग्रेसला सोबत घेऊन स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मुंढवा जमीन प्रकरणात पार्थ पवारांवर गुन्हा दाखल करा

# अंजली दमानिया यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २३ :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी केली आहे. मुंढवा येथील जमीन प्रकरणात ही मागणी करण्यात आली असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, असे दमानिया यांनी म्हटले आहे.



मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी अंजली दमानिया आणि विजय कुंभार दोघेही आज बावधन पोलिस ठाण्यात पोहोचले होते. पार्थ पवार यांच्याविरोधात मिळालेल्या सगळ्या कागदपत्रांवरील प्रत्येक पानावर त्यांची सही आणि व्यवहारासंबंधी नोटरी आहे. यावरून पार्थ पवारांना कुणीच वाचवू शकत नाही. हे डॉक्युमेंट्स पोलिसांना देण्यासाठी आम्ही बावधन पोलिस ठाण्यात आलो. दरम्यान, ही कागदपत्रे १८ डिसेंबरला पोलिसांकडे गेले होते, मात्र अजुनपर्यंत काही होत नव्हते, म्हणून आज आम्ही तक्रार देण्यासाठी आलो, असे अंजली दमानिया यांनी सांगितले.

पोलिसांची भेट घेतल्यानंतर अंजली दमानिया यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुण्यात मुंढवा प्रकरणात दोन एफआयआर दाखल झाल्या आहेत. याशिवाय, बावधन येथील एका प्रकरणात केवळ मुद्रांक शुल्क बुडवल्याची तक्रार आहे, ज्यात पुढे काही निष्पन्न होण्याची शक्यता कमी असल्याचे दमानिया यांनी सांगितले. त्यांनी पोलीस आयुक्त आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या उपायुक्तांना या गुन्ह्याच्या स्वरूपाबाबत माहिती दिली असून, पोलिसांची कारवाई टप्प्याटप्प्याने सुरू असल्याचे नमूद केले.

दमानिया यांच्या मते, या गुन्ह्यात एकच एफआयआर आणि एकच तपास अधिकारी असणे आवश्यक आहे, अन्यथा तपास भरकटू शकतो. खारगे समितीसमोर दिग्विजय पाटील आले नाहीत, तर पार्थ पवार कधी येणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दिग्विजय पाटील यांची पोलिसांनी गोडीगुलाबीत चौकशी केल्याचा आरोपही त्यांनी केला. सत्ताधारी पक्ष ही केस विसरून जाईल अशी अपेक्षा करत असल्याचे दमानिया म्हणाल्या.

# राजू वैद्य यांचा ठाकरे गटाला रामराम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** कट्टर हिंदुत्ववादी भूमिका मांडता यावी या एकाच उद्देशाने आपण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष सोडून भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख राजू उर्फ रेणुकादास वैद्य यांनी केला आहे. भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करताच राजू वैद्य यांनी उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाची कास सोडली असल्याचा आरोप केला आहे. मुंबईमध्ये झालेल्या प्रवेश सोहळ्यात भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वैद्य यांचे पक्षात स्वागत केले.



यावेळी राजू वैद्य यांनी पक्षांतराबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली. महाविद्यालयीन जीवनापासून हिंदुत्व या एकाच अजेंडावर आम्ही काम करत आलो आहोत. मात्र आता मी ज्या पक्षात होतो, त्या पक्षात हिंदुत्ववादी भूमिका मांडणे शक्य नाही. त्यामुळे आपण पक्षांतर केले असल्याचे राजू वैद्य यांनी यावेळी सांगितले. पक्ष जी जबाबदारी देईल, ती जबाबदारी पार पाडण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे देखील ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर शहराच्या विकासासाठी आपण हा पक्ष प्रवेश केला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

राजू वैद्य यांच्या भाजपमध्ये प्रवेशाच्या चर्चांवर अंबादास दानवे म्हणाले की, परवापर्यंत राजू वैद्य आमच्यासोबत होते. अचानक काय घडलं हे समजत नाही. ते एक सक्षम आणि चांगले कार्यकर्ते होते. पक्षाने त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. तरीही त्यांनी हा निर्णय का घेतला, हे अनाकलनीय आहे. पक्षांतराच्या मुद्द्यावर भाष्य करताना दानवे यांनी स्पष्ट केलं की, प्रत्येक पक्षात काही ना काही अंतर्गत मतभेद असतात. मात्र उखाळ्या-पाखाळ्या काढण्यातून राजकीय संस्कृती सुधारत नाही. कोणत्या पक्षात मतभेद नसतात? पण त्यावर सार्वजनिक टीका करणे योग्य नाही, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात काँग्रेसचे माजी महापौर रशीद मामू यांच्या प्रवेशावरून राजकीय वातावरण तापले आहे.

# लाडकी बहीण योजनेत ४० लाख महिलांचा लाभ थांबण्याची शक्यता




**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने राबवली जाणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांसाठी आर्थिक आधार देणारी महत्त्वाची योजना ठरली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा 1500 रुपयांची थेट आर्थिक मदत दिली जाते. जुलै 2024 पासून सुरू झालेल्या या योजनेमुळे राज्यातील कोट्यवधी महिलांना दिलासा मिळाला आहे. मात्र आता या योजनेबाबत एक अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली असून, सर्व लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे योजनेतून अपात्र लाभार्थी बाहेर काढणे आणि केवळ पात्र महिलांनाच मदत मिळावी हा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. महिला व बालविकास विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सहभागी असलेल्या प्रत्येक महिलेला ई-केवायसी करणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी आधी दिलेली मुदत वाढवून आता थेट 31 डिसेंबर 2025 पर्यंतची अंतिम संधी देण्यात आली आहे. या मुदतीत ई-केवायसी न करणाऱ्या महिलांना पुढील काळात योजनेचा लाभ मिळणार नाही, असा स्पष्ट इशारा विभागाकडून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंत 1 कोटी 60 लाख महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, मात्र अजूनही 30 ते 40 लाख महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, ही बाब शासनासाठी चिंतेची ठरली आहे.

# एनसीपी नेत्याचे अपहरण करून मारहाण

■ **महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. २३ :** महाराष्ट्रातील नांदेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जीवन घोगरे पाटील यांचे अपहरण करून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली, ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये जीवन घोगरे यांना त्यांच्या कारमधून जबरदस्तीने दुसऱ्या कारमध्ये बसवताना स्पष्ट दिसते. अपहरणानंतर सात जणांनी त्यांच्यावर मारहाण केली, ज्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. घटना दुपारी साडेअकरा ते दुपारी बारा वाजेच्या दरम्यान घडली, जेव्हा जीवन घोगरे कामावर जात होते. त्यांची गाडी हडको पाण्याच्या टाकीजवळ थांबवण्यात आली आणि अज्ञात ठिकाणी नेऊन मारहाण करण्यात आली. अपहरणानंतर त्यांना मुसलमानवाडीजवळ सोडण्यात आले.

जखमी झालेल्या जीवन घोगरे यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. नांदेड ग्रामीण पोलीस प्रकरणाचा सखोल तपास करत असून, सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. जीवन घोगरे यांनी आरोप केला की अपहरण महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रताप चिखलीकर यांच्या सांगण्यावरून करण्यात आले. सात आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेतः शुभम दत्ता सुनेवाड, राहुल मारुती दासरवाड, कौस्तुभ रमेश रणवीर, विवेक नरहरी सूर्यवंशी, माधव बालाजी वाघमारे, मोहम्मद अफरोज फकीर (चालक) आणि देवानंद भोळे.

# पालिका निवडणुकांसाठी रिपाइं डेमोक्रॅटीक पक्षासह इतर पक्षाची महाराष्ट्र लोकसेवा आघाडी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २३ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून अनेक राजकीय पक्ष कामाला लागले असून सत्ता मिळविण्याच्या दृष्टीने अनेक छोट्या मोठ्या राजकीय पक्षांच्या आघाड्या होत आहेत.याच पार्श्वभूमीवर नुकतीच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक पक्षाने इतर पक्षांच्या साथीने महाराष्ट्र लोक विकास आघाडीची स्थापना केली असून नुकतीच कनिष्क कांबळे व करुणाताई मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबई मराठी पत्रकारसंघ येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत या आघाडीची औपचारिक घोषणा करण्यात आली.




राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रातील सामान्य नागरिकांचे वीज, पाणी, स्वच्छ रस्ते, आरोग्य,शिक्षण यासारखे मूलभूत प्रश्न कोणत्याही सत्ताधारी पक्षांनी सोडवले नसून बेरोजगारी आणि महिलांवरील अत्याचार देखील वाढताहेत. आजवर विकासाच्या नावाखाली जनतेची केवळ दिशाभूलच केली आहे. त्यामुळेच सर्वसामान्य लोकांचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्याकरिताच महाराष्ट्र लोक विकास आघाडीची स्थापना झाली असून या पक्षाच्या वतीने राज्यातील महानगर पालिकांच्या निवडणुका लढवल्या जाणार आहेत. या आघाडीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक पक्ष ( कनिष्क कांबळे) स्वराज्य शक्ती सेना (करुणा मुंढे) राष्ट्रवादी रिपब्लिकन पक्ष (डॉ.राजेश नागोसे) भारत जनाधार पार्टी (सुरेंद्र अरोरा) महाराष्ट्र विकास आघाडी या पक्षांचा समावेश आहे. लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आघाडीच्या वतीने मुंबईसह राज्यभरातील महानगर पालिका निवडणुकांसाठी प्रत्येक पक्षाची उमेदवारी घोषित करण्यात येणार असल्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक पक्षाचे नेते कनिष्क कांबळे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले.

### पुणे पोलिस आयुक्तांचे पीआरओ

# प्रवीण घाडगे निलंबित

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २३ :** पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांचे जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) पोलिस कॉन्स्टेबल प्रवीण घाडगे यांना गंभीर अनियमितता आणि पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरोधात सेवेतून बडतर्फ करण्याची विभागीय प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. गोपनीय चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली. चौकशीत प्रवीण घाडगे यांनी आपल्या पदाचा आणि पोलिस आयुक्तांच्या नावाचा वापर करून एका वादग्रस्त बिल्डरला मदत करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. संबंधित बिल्डरचा आंदेकर टोळीशी थेट संबंध असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घाडगे यांनी पोलिस आयुक्तांच्या नावाचा वापर करत सहाय्यक पोलिस आयुक्त शंकर खटके यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. आंदेकर टोळीशी संबंधित बिल्डर अविनाश पवार याला जमीन वादाच्या प्रकरणात मदत मिळावी, यासाठी हा दबाव टाकण्यात आला होता. मात्र, एसीपी खटके यांनी कोणतीही मदत करण्यास स्पष्ट नकार देत हा प्रकार थेट पोलिस उपायुक्त निखिल पिंगले यांच्या निदर्शनास आणून दिला. दरम्यान, जमीन वादाच्या एका प्रकरणात काही तक्रारदार अविनाश पवार यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी पुणे पोलिस आयुक्तालयात आले होते.



### धान भरडाईत होणाऱ्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषी राईसमिलर्स व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

# किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २३ :** गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून धान खरेदी करून सदर धान भरडाई करणाऱ्या राईसमिलर्सना देण्यात आले. परंतु जिल्ह्यातील सिएमआर मिलींग करणारे राईसमिलर्स अभिकर्ता संस्थेकडून भरडाई करीता धान घेऊन त्याची भरडाई न करता अभिकर्ता संस्थेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत संगनमत करून काळ्या बाजारात विक्री केली आहे व त्या ऐवजी काळ्या बाजारातील मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ पुरवठा विभागातील गुणनियंत्रण अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचेसोबत संगनमत करून शासनास जमा केला आहे.

करीता या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी राईसमिलर्स व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरम बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की पणन हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये शासनाने खरेदी केलेल्या धानाची भरडाई व राईस फोर्टिफिकेशन बाबत शासन परिपत्रक हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ५.१५ नुसार प्रती क्विंटल धान भरडाई करीता सर्वसाधारणपणे किमान ०.८ युनिट वीज खर्च होत असल्याची खातरजमा करावी, याबाबतची तपासणी संबंधित जिल्हा पणन अधिकारी/प्रादेशिक व्यवस्थापक आदिवासी विकास महामंडळ यांनी करावयाची आहे. किमान ०.८ युनिट वीज खर्च होत नसल्यास त्या गिरणीधारकास भरडाई खर्च व वाहतुकीचा खर्च तसेच त्या अनुषंगिक देय बाबी अदा करण्यात येऊ नये.सदर बाब तात्काळ प्रधान सचिव/उपसचिव-ना.पु २९ यांना सादर करणे अनिवार्य आहे.

मिल मधिल आवारात असलेले गोदाम सिएमआर करीता घेण्यात येऊ नये असे परिपत्रकात नमुद असले तरी सिएमआर मिलींग करणाऱ्या जय अम्बे राईसमिल व माँ शारदा फुड प्रॉडक्ट कुरुड या दोन्ही राईसमिलच्या कंपाऊंड मध्ये असलेल्या पंकज मोटवाणी यांचे गोडाऊन नियमबाह्यपणे किरायाने घेतले आहेत.शासनाच्या विहित केलेल्या गोदामात सीसीटीव्ही यंत्रणा लावणे बंधनकारक असतांना व सदर कॅमेरे अशा ठिकाणी लावावेत जेणेकरून जमा होणारा तांदूळ,वाटप करण्यात येणारा तांदूळ, वाहतुकिचे ट्रक इत्यादीचे स्पष्टपणे चित्रीकरण होईल.दर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे जमा करण्यात येईल. शासनाकडून मागणी केल्यास तसेच तपासणीच्यावेळी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

अभिकर्ता संस्था/ डिएमओ/आरएमओ यांनी मिलर्सला वितरण आदेश (डिओ)दिल्यावर गिरणीमालकाने धानाचे ७ दिवसाच्या आत उचल करणे आवश्यक आहे. अन्यथा विलंबास जबाबदार असणाऱ्या मिलवर प्रती प्रती विलंब दिन ७० पैसे प्रती क्विंटल या प्रमाणे दंड आकारावा.तसेच धानाची उचल केल्यानंतर १० दिवसाच्या आत भरडाई केलेला तांदूळ (सिएमआर) शासकीय गोदामात जमा करण्यात यावा. अन्यथा सिएमआर किंमतीवर द.सा.द.शे.१० टक्के इतका दंड आकारण्यात येईल. सदरील दंड गिरणीधारकाची बँक गॅरण्टी,गिरणीधारकास देय असलेला भरडाई/वाहतूक खर्च प्रदानातुन एक रकमी वसूल करण्यात यावा.

### विकासाच्या नावाखाली विनाश होतोय

# आदित्य ठाकरेंचा केंद्रावर घणाघात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी अरावली पर्वतरांगांच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री अरावली पर्वतरांगा उद्ध्वस्त करण्याचे समर्थन करतात, ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे, अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. आज अरावली, उद्या पश्चिम घाट आणि हिमालयातही हे खाणकामाला परवानगी देतील, असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला.



काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने अरावली पर्वतरांगेची व्याप्ती ठरवण्यासाठी केंद्र सरकारच्या तज्ज्ञ समितीने सुचवलेली व्याख्या स्वीकारली. या नव्या व्याख्येनुसार जमिनीपासून ज्या भू-आकृतींची उंची किमान 100 मीटर आहे, त्यांनाच 'अरावली पर्वतरांग' मानले जाईल. 100 मीटरपेक्षा कमी उंची असलेल्या टेकड्या किंवा भाग आता तांत्रिकदृष्ट्या 'अरावली'च्या व्याख्येतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे, कारण 100 मीटरपेक्षा कमी उंचीच्या भागांत आता खाणकाम आणि बांधकामासाठी खुला होण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, केंद्र सरकारवर सडकून टीका करत, भाजप पर्यावरणाचा विनाश करायला निघाल्याचा गंभीर आरोप केला आहे. आदित्य ठाकरे यांनी अरावलीतील खाणकामाला दिलेल्या परवानगीबाबत केंद्र सरकारला काही रोकडे सवाल विचारले आहेत.

# चांदूर रेल्वेतील मीरा इंडस्ट्रीजला भीषण आग

## चणाडाळ, कुटार व महागडी यंत्रसामग्री जळून खाक







### कोट्यवधीच्या नुकसानीचा अंदाज

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.23 )**– चांदूर रेल्वे शहरालगत असलेल्या कुऱ्हा रोडवरील एमआयडीसी परिसरातील मीरा इंडस्ट्रीज या चणाडाळ प्रक्रिया करणाऱ्या मोठ्या मिलमध्ये मंगळवारी (ता. 23) पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत मोठ्या प्रमाणात चणाडाळ, चणा, कुटार तसेच मिलमधील महागडी यंत्रसामग्री जळून खाक झाली असून उद्योगाला मोठ्या आर्थिक नुकसानीचा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मीरा इंडस्ट्रीजमध्ये दररोज सुमारे 70 टन चण्यावर प्रक्रिया करून चणाडाळ निर्मिती केली जाते. जवळपास दोन ते अडीच एकर परिसरात पसरलेली ही इंडस्ट्री तीन मजली इमारतीत कार्यरत असून, त्यामुळे आगीचे स्वरूप अधिकच भीषण झाले. आगीचे प्राथमिक कारण शॉर्टसर्किट असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सोमवार रोजी रात्री दहापर्यंत मिलमध्ये नियमित कामकाज सुरू होते. काम संपल्यानंतर मजूर व मालक घरी निघून गेले होते, मात्र काही मजूर मिल परिसरातील निवासस्थानी झोपले होते. थंडीचे दिवस आणि मध्यरात्र असल्यामुळे आग नेमकी केव्हा लागली याची कोणालाही चाहूल लागली नाही. मंगळवारी सकाळी मिलमधून धूर निघत असल्याचे लक्षात येताच मालक पियुष गंगन व सचिन गंगन यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली. तात्काळ मिलचे शटर उघडताच आत अग्नीचे रौद्र रूप पाहायला मिळाले आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले.

### अग्निशामक दलाचे अथक प्रयत्न

आगीची माहिती मिळताच चांदूर रेल्वे, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर, तिवसा व अमरावती येथील अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. चांदूर रेल्वे येथील पंपिंग स्टेशनमधून अंदाजे 30 ते 35 फेऱ्या मारत पाण्याचा मारा करण्यात आला. सकाळी 7.30 ते सायंकाळी 5 पर्यंतच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर अखेर आगीवर पुर्णत: नियंत्रण मिळवण्यात अग्निशामक दलाला यश आले. या मोहिमेत अग्निशामक विभागाचे प्रमुख अमोल भुजाडे, न.प. लिपीक जितू कर्से, कर्मचारी पंकज इमले, वाहन चालक अमोल कडू, फायरमन निरज दुबे, मयूर घोडेस्वार यांच्यासह अमरावती, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर व तिवसा येथील कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व तरुणांनीही घटनास्थळी धाव घेत मदतीचा हात पुढे केला. नागरिकांच्या सहकार्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

### जीवितहानी टळली; पंचनामा सुरू

सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र मिलमधील कच्चा माल, तयार चणाडाळ साठा, विद्युत यंत्रणा व इतर साहित्य जळून खाक झाल्याने उद्योगाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. आगीमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, नुकसानीचा पंचनामा सुरू आहे. पुढील तपासात आगीचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# 'एक दिवस सैनिकांसाठी' अभियान राबविणार– जिल्हाधिकारी

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

### माजी सैनिक मेळावा संपन्न





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.23 )** – देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'एक दिवस सैनिकांसाठी' हे अभिनव अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केली. या अभियानाअंतर्गत सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध शासकीय कार्यालयांतील प्रलंबित कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत सशस्त्र सेना ध्वजदिन–2025 निधी संकलनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गजरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश ठाकरे, जिल्हा सैनिक अधिकारी आनंद पाथरकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले की, भारतीय सैनिकांच्या शौर्यामुळेच देश सुरक्षित व प्रगत आहे. सैनिक देशसेवेमुळे कुटुंबाला वेळ देऊ शकत नाहीत, त्यामुळे त्यांच्या अडचणी प्रशासनाने समजून घेणे आवश्यक आहे. 'एक दिवस सैनिकांसाठी' अभियानातून महसूल, कृषी, पोलीस आदी विभाग समन्वयाने प्रश्न मार्गी लावतील. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेने 25 लाख रुपयांचा ध्वजदिन निधीचा धनादेश सुपूर्द केला. वीरमाता, वीरपत्नी व गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. यंदा 3 कोटी रुपये ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# रेल्वेच्या धडकेत गुराख्याचा मृत्यू

**अमरावती** – बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्डी ते टिमटाळा रेल्वेमार्गावर रेल्वेच्या धडकेत एका गुराख्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी (दि. 21) सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास घडली. मृतकाचे नाव मुन्ना लखन चव्हाण (वय 28, रा. एमआयडीसी, अमरावती) असे आहे. प्राप्त माहितीनुसार, मुन्ना चव्हाण हा उदरनिर्वाहासाठी जनावरे चारण्याचे काम करत होता. तो कर्णबधीर असून विस्मरणाची सवय असल्याचे सांगितले जाते. रविवारी सकाळी तो आपल्या सहकाऱ्यासह पार्डी–टिमटाळा मार्गालगत असलेल्या जंगल परिसरात जनावरे चारण्यासाठी गेला होता. दरम्यान, जनावरे चारताना तो रेल्वे रुळावर उभा असताना येणाऱ्या ट्रेनचा आवाज न ऐकू आल्याने त्याला ट्रेनची जोरदार धडक बसली. या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.



**अमरावती**– पंचवटी येथील उड्डाण पूलाखालून जात असताना अचानक एक भला मोठा ट्रेलर फसल्याची घटना मंगळवारी( दि.23) रात्री उशिरा घडली. घटनेनंतर या ठिकाणी काहीवेळ वाहतूकीचा खोळंबा निर्माण झाला होता. माहिती मिळताच गाडगे नगर पोलीस घटनास्थळी पोहोचून फसलेले वाहन मोकळे करण्याचा प्रयत्न केल्या जात होता.

# मोर्शी पोलिसांनी रोखली अवैध जनावरांची वाहतूक

## 2 वगार व 10 हल्यांना जीवनदान | 7.86 लाखांचा मुद्देमाल जप्त; एक आरोपी ताब्यात





महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.23 )**– गोपनीय माहितीच्या आधारे दि.23 डिसेंबर 2025 रोजी मोर्शी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अवैध जनावरांच्या वाहतुकीवर यशस्वी कारवाई केली. मोर्शी–अमरावती मार्गावरील ग्राम तळणी फाट्यावर नकाबंदी करून संशयित मालवाहू 407 टेम्पो (क्र. एमएच 43 एफ 9729) थांबविण्यात आला.

तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये अवैधरीत्या कोंबलेली जनावरे आढळून आली. याप्रकरणी शेख राजीक शेख अमीर (वय 40, रा. इस्लामनगर, वरूड, जि. अमरावती) यास ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून 2 वगार व 10 हले अशी एकूण 12 जनावरे (अंदाजे किंमत 86,000) तसेच मालवाहू टेम्पो (किंमत 7,00,000) असा एकूण 7,86,000 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देण्यास प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा नोंद करून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. जप्त जनावरे सुरक्षिततेच्या दृष्टीने पिंपळखुटा मोठा येथे दाखल करण्यात आली आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले (ठाणेदार, मोर्शी) यांच्या नेतृत्वात पोउपनि. आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार छत्रपती, करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे व चालक अब्दुल हबीब यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत आई-मुलाचा मृत्यू, नातू गंभीर

## मोर्शी–आष्टी मार्गावर सिंभोरा गावाजवळ घटना

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 23 )** – मोर्शी–आष्टी मार्गावर सिंभोरा गावाजवळ मंगळवारी (दि. 23 डिसेंबर) दुपारी साडेतीनच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या आई–मुलाचा जागीच मृत्यू, तर त्यांचा नातू गंभीर जखमी झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. हा अपघात भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या अपघातात करीमशहा रहमानशहा (वय 55) आणि त्यांची आई तमीजाबी रहमानशहा (वय 68, दोघेही रा. आष्टी) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत दुचाकीवर असलेला फारुखशहा करीमशहा (वय 24) हा गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, करीमशहा, त्यांची आई तमीजाबी व नातू फारुख हे तिघेही एमएच 31 आर 3312 क्रमांकाच्या दुचाकीने काही कामानिमित्त आष्टीहून मोर्शीकडे जात होते. सिंभोरा गावाजवळ समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकी पूर्णत: क्षतिग्रस्त झाली आणि तिघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात करीमशहा व तमीजाबी यांना गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलीस ठाण्याचे प्रभारी राहुल आठवले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन रुग्णवाहिकेच्या सहाय्याने जखमी व मृतांना उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे हलविले. या कार्यात तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे, रवी परतेती व प्रवीण धोटे यांनी मोलाची मदत केली. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणीनंतर करीमशहा व तमीजाबी यांना मृत घोषित केले.

# मंथन पाळणकर हत्या प्रकरणात आरोपींचा क्राइम सीन रीक्रिएट

## राजापेठ पोलिसांकडून शहरातील प्रमुख चौकांत आरोपींची धिंड



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 23 )**– सातुर्णा परिसरातील मंथन पाळणकर हत्या प्रकरणातील आरोपींचा राजापेठ पोलिसांनी 21 डिसेंबर रोजी शहरात धिंड काढून घटनास्थळाचा (क्राइम सीन) रीक्रिएट केला. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले. यापूर्वीही पोलिसांनी आरोपींची धिंड शहरात काढली होती.

या हत्याकांडातील मुख्य आरोपी यश नामदेवराव पन्नासे याच्यासह हर्षद उर्फ गुड्डू मनोज रामटेके, ओम जितेंद्र भलावी, आकाश गजानन तुपटकर, प्रतीक ज्ञानेश्वर देवुडकर व अन्य तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. तपासाच्या दृष्टीने आरोपींकडून घटनाक्रम स्पष्ट करून घेण्यासाठी क्राइम सीन रीक्रिएट करण्यात आला.22 डिसेंबर रोजी पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तसेच नांदगाव पेठचे पीएसआय दिनेश दहातोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चवरे नगर येथील गणेश गार्डनपासून गोपाळ नगर ते पंचवटी चौकापर्यंत आरोपींचा जुलूस काढण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान कायदेशीर बाबींचे पालन करत व्हिडीओ व छायाचित्रण कॅमेऱ्याद्वारे नोंदविण्यात आले.या कारवाईमुळे तपासाला गती मिळणार असून, आरोपींच्या सहभागाबाबत महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पहिल्याच दिवशी 1,026 नामनिर्देशन अर्जांची उचल

## इच्छुक उमेदवारांमध्ये प्रचंड उत्साह | महानगर पालिका निवडणुक




महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.23 )** – येत्या 15 जानेवारी रोजी होणाऱ्या अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नागरिकांसह इच्छुक उमेदवारांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर मंगळवार (दि. 23) पासून नामनिर्देशन अर्ज वितरणाची प्रक्रिया सुरू झाली. पहिल्याच दिवशी या प्रक्रियेला विक्रमी प्रतिसाद मिळत अवघ्या चार तासांत तब्बल 1,026 उमेदवारांनी नामनिर्देशन अर्जांची उचल केली.

सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या विविध झोन कार्यालयांमध्ये इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विविध राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज उचलल्याने आगामी निवडणूक अत्यंत चुरशीची ठरण्याचे संकेत मिळत आहेत. अर्ज वितरणाच्या पहिल्याच दिवशी उमेदवारांचा उत्साह शिगेला पोहोचलेला दिसून आला. नामनिर्देशन अर्ज उचलण्याची प्रक्रिया 29 डिसेंबरपर्यंत सुरू राहणार असून, पुढील काही दिवसांत अर्ज उचलीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी एकूण 6 लाख 77 हजार 180 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी 797 मतदान केंद्रांची रचना करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार सात वेगवेगळी झोन कार्यालये कार्यरत आहेत.

### नामांकन अर्ज दाखल नाही

पहिल्या दिवशी सातही झोन कार्यालयांतून एकूण 1,026 नामनिर्देशन अर्जांची उचल झाली. मात्र, मंगळवारी एकाही उमेदवाराने प्रत्यक्ष नामांकन अर्ज दाखल केलेला नाही.

### झोन कार्यालयनिहाय अर्ज उचल

| | |
|---|---|
| कार्यालय क्र. 1 | – 169 |
| कार्यालय क्र. 2 | – 143 |
| कार्यालय क्र. 3 | – 115 |
| कार्यालय क्र. 4 | – 174 |
| कार्यालय क्र. 5 | 1 103 |
| कार्यालय क्र. 6 | – 86 |
| कार्यालय क्र. 7 | – 236 |
| एकूण | – 1,026 |

### अर्ज स्वीकृती व निवडणूक कार्यक्रम

30 डिसेंबरपर्यंत नामांकन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. 25 व 28 डिसेंबर रोजी सुटी राहील. 31 डिसेंबरला अर्जांची छाननी होणार आहे. 1 व 2 जानेवारीला अर्ज मागे घेण्याची मुदत असून, 3 जानेवारीला उमेदवारांची अंतिम यादी व चिन्ह वाटप होईल. 13 जानेवारी रात्री 10 वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे.

मंगळवारी पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात अर्ज उचलले गेले असले, तरी एकाही उमेदवाराने अद्याप नामांकन अर्ज दाखल केलेला नाही. पहिल्या दिवसातील विक्रमी अर्ज उचलीमुळे अमरावती महानगरपालिकेची निवडणूक रंगतदार व अटीतटीची ठरणार, हे स्पष्ट झाले आहे.

# तरुणीला शिवीगाळ करून मारहाण

### गाडगेनगर ठाणे हद्दीतील घटना

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 23 )** – गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणीला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना मंगळवारी (दि. 22 डिसेंबर) घडली असून, याप्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणीचे पीयूष चव्हाण (वय 21, रा. वृंदावन कॉलनी) याच्यासोबत पूर्वी प्रेमसंबंध होते. मात्र, पीयूष हा संशयाच्या कारणावरून तरुणीशी वाद घालून तिला मारहाण करीत असल्याने तिने त्याच्याशी बोलणे बंद केले होते, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, 21 डिसेंबर रोजी तरुणी ही तिच्या मैत्रिणीच्या मुलीची प्रकृती बिघडल्याने तिच्यासोबत दवाखान्यात गेली होती. उपचार आटोपल्यानंतर ती एका स्टॉलवर पाणीपुरी खात असताना पीयूष चव्हाण हा आपल्या एका मित्रासोबत तेथे आला. यावेळी त्याने तरुणीला अश्लील शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच धारदार वस्तूने दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर घाबरलेल्या तरुणीने गाडगेनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरोधात संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

# 93 वर्षीय वृद्धेचा विनयभंग

**अमरावती – कुऱ्हा** पोलीस ठाण्याच्या हद्दीत 22 डिसेंबर रोजी दुपारी एका 93 वर्षीय वृद्धेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली. नैसर्गिक विधीसाठी गेलेल्या वृद्धेचा सूरज उदयभान बारबुदे (25) याने पाठलाग करून तिला शेताच्या धुऱ्यावर नेले. तेथे त्याने असभ्य वर्तन करत वृद्धेचा विनयभंग केला.


**CHANGE OF NAME**

I, SATTUBAI (earlier incorrectly written as SATTUBAI), Mother of RATHOD OMKAR TIRUPATI, Resident of Near Shri Balaji Hospital, Dr. Colony, Daryapur, P.O. Daryapur, Dist. Amravati, Maharashtra – 444803,do hereby declare that my correct name is SATUBAI.The name SATTUBAI appearing in records is incorrect.Henceforth, my name should be read and written as SATUBAI for all official, legal, and personal records.

# केवळ जागरूक आणि सावध ग्राहकच सुरक्षित

(राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन विशेष २४ डिसेंबर २०२५)

--------------



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

आजच्या डिजिटल युगात आर्थिक व्यवहार किंवा खरेदी करणे सोपे झाले आहे, परंतु त्याच वेगाने फसवणूक, बनावट उत्पादने, भेसळ, खोटा देखावा आणि सायबर गुन्हे देखील मर्यादेपलीकडे वाढले आहेत. इतरांवर आंधळेपणाने विश्वास, ढोंग, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि खोट्या आश्वासनांवर विश्वास ठेवण्याऐवजी, आपण स्वतःच्या विवेकबुद्धीचा वापर केला पाहिजे. धोरणे, नियम आणि कायदे पाळा; तरच आपण जागरूक ग्राहक बनू शकू.

जर एखाद्या ग्राहकाला एखादी वस्तू किंवा सेवा मिळाली तर ते त्यांनी खर्च केलेल्या किमतीच्या तुलनेयोग्य असली पाहिजे. ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत वस्तूबाबत ग्राहकांचे महत्त्वाचे अधिकार प्रामुख्याने सुरक्षिततेचा अधिकार, माहितीचा अधिकार, निवडीचा अधिकार, सुनावणीचा अधिकार, तक्रारींचे निवारणाचा अधिकार आणि ग्राहक जागरूकता यांचा अधिकार हे सहा आहेत.

ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ सोबत अनेक विशिष्ट नियम आणि कायदे आहेत. जसे की ग्राहक संरक्षण (ई-कॉमर्स) नियम, २०२० आणि केंद्रीय आणि राज्य ग्राहक वाद निवारण आयोगांना नियंत्रित करणारे कायदे. हे वेगवेगळे कायदे एकत्रितपणे ग्राहकांना अनुचित पद्धती, उत्पादन आणि सेवा दोषांपासून संरक्षण देतात. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण ही कायद्याअंतर्गत ग्राहकांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेली एक वैधानिक संस्था आहे. ग्राहक वाद निवारण आयोग विवादांचे निराकरण करण्यासाठी तीन-स्तरीय रचना प्रदान करतो, जिल्हा स्तरावर - ५० लाख रुपयांपर्यंत, राज्य स्तरावर - ५० लाख रुपयांपासून ते २ कोटी रुपयांपर्यंत आणि राष्ट्रीय आयोग - २ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे वाद.

उत्पादन दायित्व कायदा हे उत्पादनाची संकल्पना आणते, ज्यामुळे उत्पादक, सेवा प्रदाता आणि विक्रेता त्यांच्या सदोष उत्पादनामुळे किंवा खराब सेवेमुळे होणा ?या नुकसानासाठी जबाबदार असतात. ग्राहक संरक्षण (थेट विक्री) कायदा, २०२१ हे कायदे फसव्या योजना रोखण्यासाठी थेट विक्री उद्योगाचे नियमन करतात. ग्राहक संरक्षण (मध्यस्थी) नियम, २०२० ग्राहक मध्यस्थी कक्ष तयार करते आणि मध्यस्थीची प्रक्रिया निश्चित करते.

ग्राहक संरक्षण (ग्राहक आयोग प्रक्रिया) नियमावली, २०२० मध्ये ग्राहक आयोगाच्या प्रक्रियेची तपशीलवार माहिती दिली आहे. ग्राहक संरक्षण (सामान्य) कायदा, २०२० मध्ये ग्राहक संरक्षणासाठी सामान्य तरतुदी देण्यात आल्या आहेत. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण (तज्ञ आणि व्यावसायिकांच्या नियुक्तीसाठी प्रक्रिया) नियमावली, २०२१ मध्ये केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणात तज्ञांना समाविष्ट करण्याची प्रक्रिया निश्चित केली आहे.

अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता नियंत्रित करतो. कृषी उत्पादन (ग्रेडिंग आणि मार्किंग) कायदा, १९३७ कृषी उत्पादनांच्या ग्रेडचे प्रमाणिकरण करतो. भारतीय मानक ब्युरो कायदा, १९८६ प्रमाणन मानकांद्वारे उत्पादनाची गुणवत्ता सुनिश्चित करतो. भारतीय करार कायदा, १८७२ अशा करारांचे नियमन करतो, जे करारांतर्गत ग्राहकांच्या हक्कांवर परिणाम करू शकतात. वस्तू विक्री कायदा, १९३० वस्तूंच्या विक्रीचे नियमन करतो.

देशातील ग्राहकांच्या फसवणुकीच्या सामान्य प्रकारांमध्ये एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती, उदाहरणार्थ, बँक खाते किंवा पॅन तपशील वापरणे समाविष्ट आहे.

स्कॅमर लोकांकडून ओटीपी, पासवर्ड किंवा कार्ड तपशील यासारखी संवेदनशील माहिती मिळवण्यासाठी ईमेल, एसएमएस किंवा फोन कॉलद्वारे बँका किंवा इतर विश्वसनीय संस्थांची तोतयागिरी करतात. युनिफाइड पेमेंट इंटरफेस आणि क्रेडिट कार्डवर अनधिकृत व्यवहार सामान्य आहेत.

गुंतवणूकदारांच्या पैशांचा वापर करून खऱ्या नफ्याऐवजी उच्च परताव्याचे आश्वासन देणारे गुंतवणूक घोटाळे, यामध्ये ई-कॉमर्स मार्केटप्लेस आणि ऑनलाइन रिटेलर साइट्सवरील स्कॅम समाविष्ट आहेत. स्कॅमर स्वतःला खरा व्यवसाय असल्याचे भासवतात आणि फोनवरून तुमचे पैसे किंवा वैयक्तिक माहिती घेतात.

भारतात सायबर हल्ले सातत्याने वाढत आहेत. राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर नोंदवलेल्या सायबर सुरक्षा घटनांची संख्या २०२२ मध्ये १०.२९ लाखांवरून २०२४ मध्ये २२.६८ लाख झाली आहे, जी १२० टक्क्यांहून अधिक वाढ आहे. देशात डिजिटल अटक मध्येही वाढ झाली आहे, जिथे फसवणूक करणारे मोठ्या प्रमाणात विशेषतः वृद्धांकडून पैसे लुटण्यासाठी डीपफेक आणि बनावट ओळखीसारख्या प्रगत पद्धतींचा वापर करत आहेत.

ह्या गुन्ह्यांवर प्रतिसाद म्हणून, सर्वोच्च न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे आणि संपूर्ण भारतात या प्रकरणांची चौकशी करण्याचे अधिकार सीबीआयला दिले आहेत आणि ऑनलाइन मध्यस्थांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या आठ महिन्यांत, महाराष्ट्र राज्यात २१८ डिजिटल अटक प्रकरणांमध्ये निष्पाप लोकांना ११२ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

२०२२-२३ या आर्थिक वर्षात, डुप्लिकेट उत्पादनांचे मूल्य सुमारे ८ लाख कोटी रुपये होते, त्यापैकी निम्म्याहून अधिक कापड आणि वस्त्र होते, जे ४,०३,९१५ कोटी रुपये होते. २०२४ मध्ये भारतातील बनावटी-विरोधी पॅकेजिंग बाजारपेठेचे मूल्य ५.५ अब्ज होते आणि २०२५-२०३३ दरम्यान ते १४.३ अब्ज पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

या वर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीत, ई-कॉमर्स क्षेत्रातील बनावट, खोटे आणि डुप्लिकेट उत्पादनांच्या विक्रीशी संबंधित ७,२२१ तक्रारी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनवर नोंदवण्यात आल्या. २०२४ च्या सरकारी आकडेवारी आणि अहवालांवर आधारित अंदाज असे दर्शवतात की बनावट औषधांमुळे होणारे आर्थिक नुकसान सुमारे ७.५ अब्ज रुपये आहे. असा अंदाज आहे की भारतात पुरवल्या जाणाऱ्या सर्व औषधांपैकी १२-२५ टक्के औषध बनावट असू शकतात.

ग्राहकांची फसवणूक झाल्यास त्वरित मदत मिळवा किंवा तक्रार दाखल करा. नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल (https://cybercrime.gov.in) वर ऑनलाइन फसवणुकीची तक्रार करा. सामान्य ग्राहक त्यांच्या तक्रारींसाठी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन वेबसाइट (consumer-helpline.gov.in/public/) वर त्वरित नोंद करू शकतात किंवा टोल-फ्री क्रमांक १८००-११-४००० किंवा १९१५ वर कॉल करून किंवा ८८०००१९१५ वर एसएमएस करून संपर्क साधू शकतात. ग्राहक डिजिटल पद्धतीने तक्रारी नोंदवण्यासाठी ग्राहक ॲप किंवा राष्ट्रीय पोर्टल ऑफ इंडियाचा वापर देखील करू शकतात.

बँक फसवणूक झाल्यास, बँकिंग लोकपालाकडे तक्रार दाखल करा. गंभीर गुन्हेगारी घटनेच्या बाबतीत, जवळच्या पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करा. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, दाव्याच्या रकमेनुसार जिल्हा, राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक मंचात तक्रार दाखल करता येते. अनेक ग्राहक संस्था आणि स्वयंसेवी संस्था ग्राहकांच्या हितासाठी मार्गदर्शन देखील करतात, काही प्रकरणांमध्ये, दिवाणी न्यायालय देखील मदत मिळविण्याचा पर्याय असू शकते.

अनेकदा, वाद सोडवण्यासाठी मध्यस्थीसारख्या पद्धती अस्तित्वात असतात. केवळ ग्राहकांची जबाबदारी आणि जागरूकताच त्यांना फसवणुकीपासून वाचवू शकते. नैतिक ग्राहक बना, निष्पक्ष राहा आणि चुकीचे धोरण वापरू नका. वस्तू आणि सेवा निवडताना, त्यांची गुणवत्ता आणि सुरक्षितता विचारात घ्या, उत्पादन किंवा सेवेबद्दल माहिती गोळा करा आणि सध्याच्या तंत्रज्ञानातील बदल किंवा नवोपक्रमांबद्दल स्वतःला अपडेट ठेवा.

ग्राहकांनी स्वतः विचार करावा आणि त्यांच्या गरजेनुसार उत्पादन किंवा सेवा निवडावी. ग्राहकांनी आपली मते मांडावी, वस्तू उत्पादक आणि सरकारसमोर आपल्या गरजा आणि इच्छा व्यक्त करा. एखाद्या उत्पादनाबद्दल किंवा सेवेबद्दल असमाधान असल्यास कळवा आणि इतरांना देखील सांगा. माहितीपूर्ण ग्राहक बना, जागरूक रहा, सुरक्षित रहा.

# भाजपात सुधीरभाऊंचा नाथाभाऊ होतोय का?



दिपक कैतके
मुंबई.

गेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने अभूतपूर्व यश मिळवत एकहाती झंझावात निर्माण केला. महायुतीचे सरकार सत्तेत आले. मात्र या विजयानंतर मंत्रिमंडळ रचनेत काही अनुभवी, जुने-जाणते नेते बाजूला राहिल्याने पक्षातील अंतर्गत राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले. विदर्भातील दिग्गज नेते यांना मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने केवळ कार्यकर्त्यांनाच नव्हे, तर राजकीय वतुर्ळालाही आश्चर्याचा धक्का बसला.

मंत्रिपद न मिळाल्यानंतर मुनगंटीवार यांनी थेट बंडखोरी न करता, वेगवेगळ्या मुद्द्यांवरून नाराजी व्यक्त करण्याची भूमिका घेतली. हिवाळी अधिवेशनात केलेले मंत्र्यांच्या अंगावर बिबट्या सोडा.. हे जहाल वक्तव्य भाजपसाठी अडचणीचे ठरले. या विधानातून त्यांच्या मनातील अस्वस्थता स्पष्टपणे दिसून आली. त्यानंतर सुधीरभाऊंचा नाथाभाऊ करण्याचा प्रयत्न तर सुरू नाही ना? अशी चर्चा रंगू लागली.

याच पार्श्वभूमीवर भाजपचे माजी दिग्गज नेते यांनी केलेले विधान विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले. सुधीर मुनगंटीवार हे बाहेरच्या विरोधकांशी लढू शकतात, पण पक्षातील अंतर्गत विरोधकांचा सामना करणे त्यांना कठीण जात आहे,ह्रअसे खडसे यांनी ठामपणे सांगितले. चंद्रपूरमधील पराभव हे बाह्य कारणांमुळे नव्हे, तर पक्षांतर्गत विरोधामुळेच झाले, असा आरोपही त्यांनी केला.

खडसे यांचे हे विधान भाजपातील जुन्या-जाणत्या नेत्यांच्या स्थितीवर प्रकाश टाकणारे आहे. भाजप हा शिस्तबद्ध पक्ष म्हणून ओळखला जात असला, तरी गेल्या काही वर्षांत नेतृत्वबदल, नव्या चेहऱ्यांना प्राधान्य आणि सत्तेच्या जवळीकतेचे राजकारण यामुळे अनेक अनुभवी नेते कडेला पडल्याचे चित्र आहे.

खडसे स्वतः या अनुभवातून गेलेले असल्याने, माझ्यासारखाच संघर्ष मुनगंटीवार यांचाही सुरू आहे, हे त्यांचे विधान केवळ सहानुभूतीपुरते मर्यादित राहत नाही, तर भाजपच्या अंतर्गत वास्तवावर बोट ठेवते. खडसे यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला, प्रदेशाध्यक्ष बदलाबाबत. सुधीर मुनगंटीवार यांनी त्या वेळी संमती दिली नसती, तर आजची राजकीय परिस्थिती वेगळी असती, असे सांगत त्यांनी सूचक इशारा दिला. म्हणजेच काही निर्णय अनावधानाने घेतले जातात, तर काही निर्णय घडवून आणले जातात आणि शेवटी त्या निर्णयांचे परिणाम संबंधित नेत्यालाच भोगावे लागतात, असा अर्थ त्यांच्या विधानातून निघतो.

आजच्या भाजपमध्ये केंद्रीय नेतृत्वाचा प्रभाव, निवडणूक जिंकण्याची क्षमता आणि प्रतिमा-व्यवस्थापन याला अधिक महत्त्व दिले जात आहे. या प्रक्रियेत संघ-भाजप विचारांवर वाढलेले, संघटन उभारणारे नेते अनेकदा दुय्यम ठरत आहेत. मुनगंटीवार हे जन्मापासून संघसंस्कारात वाढलेले, भाजपच्या विस्तारात मोठा वाटा उचललेले नेते आहेत, हे खुद्द खडसे यांनी मान्य केले. तरीही राजकीय गणिते आणि अंतर्गत समीकरणांमुळे ते सध्या अडचणीत सापडल्याचे चित्र आहे.

म्हणूनच प्रश्न उभा राहतो–भाजपात सुधीर मुनगंटीवार यांचाही ह्यनाथाभाऊह्ण होणार का? खडसे यांच्या अनुभवावरून पाहता, पक्षात अंतर्गत विरोध वाढला की नेतृत्व कितीही मजबूत असले तरी नेत्याला एकाकी व्हावे लागते. मात्र मुनगंटीवार यांची संघटनात्मक ताकद, विदर्भातील प्रभाव आणि वैचारिक निष्ठा पाहता ते थेट बंडाचा मार्ग स्वीकारतील, अशी शक्यता कमीच आहे. आजच्या सध्याच्या राजकारणात सत्ता आणि संघटन यांचा समतोल राखणे हेच मोठे आव्हान ठरत आहे. सुधीर मुनगंटीवार यांचा संघर्ष हा केवळ एका नेत्याचा वैयक्तिक प्रश्न नसून, भाजपमधील जुन्या नेतृत्वाच्या भवितव्याचा आरसा आहे. हा संघर्ष कोणत्या टप्प्यावर थांबतो, यावर भाजपची अंतर्गत राजकीय दिशा ठरणार आहे.

■ ■ ■

# रुग्णसेवेचे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलणारे डॉ. अशोक बेलखोडे



माणूसपणाची पाऊलवाट



सुजाता बंडावार

डॉ. शशिकांत अहंकारी यांच्या डॉक्टर खेड्यावर का जात नाहीत? या प्रश्नावर काम करण्यासाठी 'हॅलो ऑर्गनायझेशन'चा भाग झालेले आणि कर्मयोगी बाबा आमटे यांच्या 'भारत जोडो' यात्रेत सहभागी झालेले डॉ. अशोक बेलखोडे यांची नाळ खेड्यांशी घट्ट जुळली आहे.

बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून, जिथे एकही डॉक्टर जायला तयार होत नव्हता, अशा अतिदुर्गम मराठवाड्यातील किनवट या आदिवासी तालुक्यात रुग्णसेवा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला व गेल्या ३२ वर्षांपासून ते हे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलत आहेत.

शेतकरी कुटुंबात जन्मलेले आणि वारकरी परंपरेचे संस्कार लाभलेले डॉ. अशोक बेलखोडे यांचे मूळ गाव नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील कोतेवाडा हे आहे. येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर औरंगाबाद येथे वैद्यकीय शिक्षण घेत असताना त्यांनी डॉ. शशिकांत अहंकारी यांनी स्थापन केलेल्या 'हेल्थ अँड अँटो लर्निंग ऑर्गनायझेशन'मध्ये काम केले.

याचे अविभाज्य घटक असताना त्यांनी आदिवासी भागातील आरोग्याची अनास्था, गरिबी आणि अज्ञानाची परिस्थिती जवळून पाहिली. यानंतर १९८५ मध्ये, डॉ. अरुण गदरे (ज्यांनी किनवटसारख्या अतिदुर्गम भागात रुग्णसेवेचा प्रयत्न केला होता) यांच्या अनुभवांवर आधारित 'किनवटचे दिवस' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हे पुस्तक वाचल्यानंतर डॉ. बेलखोडे यांनी मनाशी पक्की खूणगाठ बांधली की, आपण किनवट येथेच रुग्णसेवा द्यायची. बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून हा निर्णय पक्का झाला.

पण ही वाट सोपी नव्हती. ज्या अवघड ठिकाणी जायचे तिथे पूर्ण तयारी हवी, यासाठी त्यांनी एम.एस. (M.S.) पूर्ण केले. दोन वर्षे आरोग्य विभागात नोकरी केली. डॉ. बोरगावकरांकडे सर्जरी शिकली. ऑर्थोपेडिक, चर्मरोगतज्ज्ञ व मानसोपचारतज्ज्ञांकडे प्रत्यक्ष अनुभव घेतले आणि पूर्ण तयारीने पत्नीसह ते किनवटला आले.

किनवटला आल्यानंतर येथील आदिवासींचे अज्ञान, अंधश्रद्धा आणि आरोग्याची अनास्था यातून मार्ग काढत, आपल्या मनातील ध्येय व येथील लोकांच्या गरजा यांच्यात त्यांनी सुवर्णमध्य साधला, तो म्हणजे 'साने गुरुजी रुग्णालय'. साध्या भाड्याच्या घरात थाटलेले साने गुरुजी रुग्णालय आता १०० खाटांच्या 'इमर्जन्सी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये रूपांतरित झाले आहे.

हा प्रवास सोपा नव्हता; येथील अठराविश्वे दारिद्रय आणि लोकांचे अज्ञान यामुळे सुरुवातीला एक वर्ष रुग्णालयासाठी जागाच मिळाली नाही.

येथे दुसरा एकही डॉक्टर येण्यास तयार नसल्याने, पूर्ण तयारीने गेलेले डॉ. बेलखोडे अवघड प्रसूती, अडलेल्या बाळंतिणी, गर्भपात, हाडे मोडणे अशा सर्व कठीण केसेस हाताळण्यास समर्थ ठरले. आरोग्य सेवेत मदत प्रणाली उभी करण्यासाठी त्यांनी येथील मुलींना नर्सिंगचे प्रशिक्षण दिले.

येथील लोकांना रुग्णसेवेसोबतच प्रबोधन करण्याचे कार्यही मी केले, असे ते अभिमानाने सांगतात. यातूनच ३० वर्षांपूर्वी असलेल्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उदासीनतेमध्ये त्यांनी आमूलाग्र बदल घडवून आणला. याचाच परिणाम म्हणजे लोकसहभागातून आज किनवट येथील आरोग्यव्यवस्थेचा प्राण असलेले साने गुरुजी रुग्णालय १०० खाटांचे झाले असून, पुढील ६० खाटांच्या विभागाचे उद्घाटन लवकरच होणार आहे.

या रुग्णालयाच्या उपलब्धतेमुळे, पूर्वी येथे येण्यास इच्छुक नसलेले डॉक्टर आता येऊ लागले आहेत. तरीसुद्धा सरकारी यंत्रणेतील आरोग्यव्यवस्थेवर ते परखडपणे टीका करतात. सरकारी दवाखाने आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे खासगीकरण हा अत्यंत चुकीचा निर्णय असल्याचे ते मानतात. येथील रिक्त पदे आणि नसलेले 'वर्क कल्चर' यावरही त्यांनी ताशेरे ओढले आहेत.

किनवटमध्ये अधिकाधिक अत्याधुनिक आरोग्य सेवा उभी करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र व सरकारी दवाखाने 'माता व बालक केंद्रित' बनवणे आणि कॅन्सर हॉस्पिटल उभे करणे, ही त्यांची भविष्यातील योजना आहे. याशिवाय, त्यांनी १ लाखापेक्षा जास्त कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्याचा विक्रम केला आहे.

ते म्हणतात, साने गुरुजींच्या विचारांनुसार आपण जिथे राहतो, तो परिसर निरामय व सर्वांगसुंदर करण्यासाठी येथील बालकांना शाळेबाहेरचे शिक्षण, युवकांसाठी शिबिरे, वाचनालय आणि महिलांसाठी बचत गट यातही पुढाकार घेतला पाहिजे.

त्यांच्या या कार्यामुळे अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले डॉ. अशोक बेलखोडे भावूक होऊन म्हणतात की, हा ३३ वर्षांचा अवघड प्रवास मी केवळ बाबा आमटे यांच्या प्रेरणेमुळेच करू शकलो. येथील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ते आता आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहनही करत आहेत.

---------------------------

**डॉ. अशोक बेलखोडे मो. नं. 9822312214**

■ ■ ■

# साने गुरुजी





श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती.

साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत.

साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले.

कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत.

१९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या.

१९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

## : लेखकांना आवाहन :

**दैनिक महासागरच्या दररोजच्या अंकात पान क्रमांक ४ प्रसिद्ध होत असून, या संपादकीय पानाकरिता राज्यभरातील लेखक, साहित्यिकांकडून प्रकाशनार्थ मोठ्या प्रमाणात साहित्य पाठवले जात आहे.**

**तथापि, वेळेनंतर येणारे प्रासंगिक लेख, व्यक्तीविशेष वा अन्य साहित्य दुसऱ्या दिवशी प्रकाशित करणे शक्य होत नाही. करिता, लेखकांनी त्यांचे साहित्य प्रकाशन तिथीच्या एक दिवस आधी पाठवावे. लेख पाठविताना शब्द मर्यादेचे भान असू द्यावे. आपले साहित्य** nagpurpost@gmail.com **किंवा** mahasagarngp@gmail.com **या मेलआयडीवर युनीकोडमध्ये पाठवावे.**

■ संपादक

# संरक्षण क्षेत्रातही भ्रष्टाचाराची कीड

वाचक लिहितात


कालची बातमी ऐकून धक्का बसला. संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहयोग आणि निर्यात प्रकरणाशी संबंधित अधिकारी लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा याला लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक झाली. केवळ त्यांनाच नव्हे तर त्यांच्या पत्नीलाही अटक करण्यात आली. शर्मा यांच्या घरातून २ कोटी २३ लाख तर पत्नीच्या घरातून दहा लाख रुपये जप्त करण्यात आले.

ही लाच खाजगी कंपन्यांशी संगणमत करून, अवैध मार्गाचा वापर करून त्यांना फायदा पोहोचवण्यासाठी घेण्यात आल्याचे कळले. म्हणजे आता भ्रष्टाचार संरक्षण क्षेत्रापर्यंत पोहोचला. संरक्षण क्षेत्र म्हणजे सगळ्यात महत्त्वाचं क्षेत्र. ज्यामुळे राष्ट्र सुरक्षित असतं. जे क्षेत्र त्याग भावना, साहस, अनुशासन ,राष्ट्रभक्ती इत्यादी गुणांसाठी सगळ्यांचे मन जिंकणारे आहे .तिथेच जर असे प्रकार होत असतील तर आदर्श ठेवायचा कोणाचा?

सामान्य जनतेच्या मनात विश्वास राहील का? सैनिकी शिक्षणात देशसेवा सर्वोपरी ही प्रथम शिकवण असते. मग असे प्रकार घडतात कसे? याचाच अर्थ आता केवळ नीतिमत्ता शिकवून चालणार नाही तर ती साधना आहे या दृष्टीने मन, बुद्धी शुद्ध करणारे शिक्षण द्यायला हवे असे वाटते. भ्रष्टाचाराची ही कीड देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करते. भ्रष्टाचाराची ही मानसिकता एखाद्या आजाराप्रमाणे आहे. तो आजार वेगाने पसरल्याचे आपण बघतोच आहोत. नेतेच भ्रष्टाचार करतात तर प्रशासन भ्रष्ट असणारच. समाजाने आदर्श ठेवायचे तर ते कोणाचे? आज आपल्या देशात भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेला आहे. जर भ्रष्टाचार खरोखरच या देशातून हद्दपार करायचा असेल, तर सरकारी मानसिकता हवी, कठोर कायदे हवेत आणि त्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी. तरच ही भ्रष्टाचाराची कीड नष्ट होईल. अन्यथा ही कीड आपली अर्थव्यवस्थाच नव्हे, तर संरक्षण क्षेत्रही पोखरून टाकेल .

■ सौ. माधवी पत्की, नागपूर.

# व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर करण्यात मदत करतात ही ५ फळे



व्हिटॅमिन बी १२ हे मानवी शरीरासाठी अत्यंत आवश्यक असणारे व्हिटॅमिन आहे, जे शरीराला निरोगी ठेवण्यासाठी आणि अशक्तपणा दूर करण्यासाठी गरजेचे असते. जर तुम्हालाही थकवा, सुस्ती किंवा दिवसभर अशक्तपणा जाणवत असेल, तर खूप शक्यता आहे की तुमच्या शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असू शकते. वेळेत याकडे लक्ष दिले नाही तर शरीरात अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

व्हिटॅमिन बी १२ मुख्यतः प्राणीजन्य पदार्थांमधून मिळते, ज्यात दूध, डेअरी उत्पादने, मासे, अंडी आणि मांस यांचा समावेश होतो. जर तुम्ही शाकाहारी असाल किंवा मांसाहारी पदार्थांऐवजी शाकाहारी आहारातूनच व्हिटॅमिन बी १२ घेण्याची इच्छा असेल, तर आम्ही तुम्हाला अशी ५ फळे सांगतोय ज्यांच्या सेवनाने शरीरात व्हिटॅमिन बी १२ चे संतुलन राखले जाऊ शकते.

खरंतर फळे हे व्हिटॅमिन बी १२ चे मुख्य स्रोत नाहीत, पण काही फळे अशी नक्कीच आहेत ज्यामुळे शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची पातळी योग्य राहते.

**सफरचंद** : सफरचंद हे शरीराला रोग आणि आजारांविरुद्ध लढण्यासाठी सुपर फ्रूटसारखे काम करते. हे फळ फायबर आणि व्हिटॅमिनचे महत्त्वाचे स्रोत आहे. यातील अँटिऑक्सिडंट्स शरीरात व्हिटॅमिन बी १२ शोषण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, ज्यामुळे शरीरात ऊर्जा टिकून राहते आणि रेड ब्लड सेल्सची कमतरता होत नाही.

**संत्री** : संत्री शरीराला आवश्यक व्हिटॅमिन पुरवते. हे व्हिटॅमिन उ ने भरपूर असते, जे आरोग्यासाठी खूप गरजेचे आहे. संत्री व्हिटॅमिन बी १२ ला शरीरात चांगल्या प्रकारे शोषण्यास मदत करते.

**डाळिंब** : डाळिंब शरीरासाठी अत्यंत फायदेशीर फळ आहे आणि कोणत्याही आजारातून बरे होताना डॉक्टर डाळिंब देण्याचा सल्ला देतात. हे व्हिटॅमिन बी १२ चे मुख्य स्रोत नसले तरी यात भरपूर फायबर, व्हिटॅमिन आणि अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराला आजारांपासून दूर ठेवतात. डाळिंब शरीरात व्हिटॅमिन बी १२ सारख्या कार्यात सहायक ठरते.

**केळी** : केळी पचनासाठी खूप गरजेचे फळ आहे. यात भरपूर फायबर आणि पोटॅशियम असते, जे आवश्यक पोषक तत्त्वांच्या शोषणात मदत करते.

**पेरु** : पेरु शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची पातळी राखण्यास सहायक ठरते. यात व्हिटॅमिन बी १२ कमी प्रमाणात असले तरी व्हिटॅमिन अ, व्हिटॅमिन ङ, फोलिक ॲसिड आणि पोटॅशियम भरपूर असते, जे शरीरात आवश्यक पोषक तत्त्वांचा साठा करतात.

**व्हिटॅमिन बी १२ चे फायदे** : व्हिटॅमिन बी १२ शरीरात रेड ब्लड सेल्स तयार करण्यास मदत करते, व्हिटॅमिन बी १२ मेंदू आणि नर्व्हस सिस्टमला मजबूत करणे आणि त्यांना योग्य प्रकारे कार्य करण्यास मदत करते. हे नर्व्ह सेल्सवर मायलिन शीथ नावाची संरक्षक थर तयार करण्यास मदत करते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### जागो ग्राहक जागो

बाजारपेठ म्हणते-
ग्राहक आहे राजा
पण सारे मिळून
वाजविती त्याचाच
बॅंड बाजा..

ग्राहकांच्या अज्ञानाचा
विक्रेता घेती फायदा
ग्राहकांनी जाणून घ्यावा
ग्राहक संरक्षण कायदा ..!

जाहीरातीचा मायाजाल
ग्राहकांना भुलविती
दक्षतेने शहनिशा केली
तर होणार नाही फजिती..!

### मैक्स हॉस्पिटलमध्ये प्रगत रोबोटिक शस्त्रक्रियेद्वारे
## अन्ननळीच्या कर्करोगावर यशस्वी उपचार




■ **नागपूर :** मैक्स हॉस्पिटल नागपूरच्या डॉक्टरांनी प्रगत कर्करोग उपचारात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. त्यांनी अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रियेद्वारे अन्ननळी (इसोफॅगस)च्या जटिल कर्करोगावर यशस्वी उपचार केले. जेव्हा कॅन्सर महत्त्वाच्या अवयवांजवळ पसरलेला असतो, अशा वेळी ही शस्त्रक्रिया उच्च जोखमीच्या कर्करोगांमध्ये रोबोटिक ऑन्को-शस्त्रक्रियेच्या वाढत्या महत्त्वाला अधोरेखित करते.

४७ वर्षीय नागपूर रहिवासी रुग्ण, जवळपास तीन महिन्यांपासून अन्न गिळण्यात अडचण जाणवत असल्याने मैक्स हॉस्पिटलमधील सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक ऑन्कोसर्जरीचे डायरेक्टर डॉ. अभिनव देशपांडे यांच्या ओपीडी मध्ये तपासणीसाठी आला होता. सविस्तर तपासणीनंतर रुग्णाला अन्ननळीचा (इसोफॅगस) कर्करोग असल्याचे निदान झाले. ज्यामध्ये ट्यूमर हृदयाच्या जवळच्या संवेदनशील भागांशी घट्ट जोडलेला होता. तपासणीनंतर, डॉक्टरांनी रोबोटिक टोटल इसोफॅजेक्टॉमी (अन्ननळी पूर्णपणे काढण्याची आधुनिक मिनिमली इनव्हेसिव्ह प्रक्रिया) ही प्रगत आणि कमी जखमीची शस्त्रक्रिया सर्वात सुरक्षित आणि प्रभावी पर्याय म्हणून शिफारस केली.

डॉ. अभिनव देशपांडे यांनी सांगितले, ह्आम्ही रोबोटिक शस्त्रक्रियेद्वारे संपूर्ण कर्करोगग्रस्त अन्ननळी काढून टाकली. नंतर पोटाला सडपातळ ट्यूबच्या आकारात रुपांतरित करून हळूहळू उर्वरित अन्ननळीच्या वरच्या भागाशी जोडले, ज्यामुळे रुग्णाला सामान्यपणे अन्न गिळता येऊ लागले. रोबोटिक सिस्टममुळे हृदय आणि डायाफ्रामच्या मधील संवेदनशील आणि कमी भागात अचूक शस्त्रक्रिया करता आली, ज्यामुळे ट्यूमर आणि त्याच्या आजूबाजूच्या लिम्फ नोड्स काढून टाकणे शक्य झाले.

## यशस्वीला टी-20 संघात संधी का नाही?




■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ :** टी-20 वर्ल्ड कपसाठी भारताने 15 खेळाडूंचा संघ जाहीर केला. निवड समितीने सर्वांना धक्का देत उपकर्णधार शुभमन गिललाच आयसीसी स्पर्धेतून वगळले. त्याच्या जागी आता यष्टीरक्षक संजू सॅमसन सलामीला खेळताना दिसणार आहे, पण बॅकअप सलामीवीर म्हणून यशस्वी जैस्वालला संधी मिळाली नाही.

यशस्वीच्या जागी सय्यद मुश्ताक अली टी-20 ट्रॉफीमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या यष्टीरक्षक ईशान किशनला संघात स्थान मिळाले. ईशानने 500 हून अधिक धावा करत आपल्या नेतृत्वाखाली झारखंडला चॅम्पियनही बनवले. त्याच्या समावेशामुळे यष्टीरक्षक जितेश शर्मालाही संघात स्थान मिळाले नाही. तर रिंकू सिंगला संधी मिळाली.

यशस्वी जैस्वालने ऑगस्ट 2023 मध्ये भारतासाठी टी-20 मध्ये पदार्पण केले होते. दुस?याच सामन्यात वेस्ट इंडिजविरुद्ध त्याने 84 धावा केल्या. त्यानंतर आपल्या सहाव्याच सामन्यात त्याने शतक ठोकले. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याला सतत संधी मिळाली. त्याने यात 4 अर्धशतकेही झळकावली.

भारतासाठी सलग टी-20 मालिका खेळल्यानंतर त्याला 2024 च्या विश्वचषकात समाविष्ट करण्यात आले. मात्र, रोहित शर्मा आणि विराट कोहलीमुळे त्याला ना सलामीला खेळण्याची संधी मिळाली, ना प्लेइंग-11 मध्ये स्थान मिळाले. विश्वचषक जिंकून दोन्ही वरिष्ठ खेळाडूंनी निवृत्ती घेतली. अशा परिस्थितीत यशस्वी टी-20 संघाचा कायमस्वरूपी सदस्य बनेल अशी अपेक्षा होती, पण गेल्या 18 महिन्यांत तो फक्त 3 टी-20 सामने खेळू शकला.

यशस्वी जैस्वालने 30 जुलै 2024 रोजी भारतासाठी शेवटचा टी-20 सामना खेळला होता. श्रीलंकेतील मालिकेदरम्यान त्याने तिन्ही सामन्यांमध्ये शुभमन गिलसोबत सलामीला फलंदाजी करताना 80 धावा केल्या होत्या. टीम इंडियातून बाहेर असताना त्याने आयपीएल आणि सय्यद मुश्ताक अली टी-20 ट्रॉफी मध्ये सातत्याने चांगली कामगिरी केली.

यशस्वीने आयपीएलच्या मागील 3 हंगामात 1500 हून अधिक धावा केल्या. त्याने 2 शतके झळकावली आणि त्याचा स्ट्राइक रेट 160 पेक्षा जास्त राहिला. हरियाणाविरुद्ध त्याने अवघ्या 49 चेंडूंमध्ये शतकही ठोकले होते. अशा परिस्थितीत टी-20 संघात सलामीवीर म्हणून त्याची दावेदारी मजबूत होती.

## गुगल, मेटा, एक्सला फोटो काढून टाकण्याचे आदेश

### गावस्कर व्यक्तिमत्त्व हक्क प्रकरण



■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २३ :** दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावस्कर पहिले भारतीय क्रीडा व्यक्तिमत्व बनले आहेत, ज्यांचे प्रसिद्धी आणि व्यक्तिमत्व हक्क न्यायालयाने संरक्षित केले आहे त. न्यायालयाने मंगळवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना चुकीची विधाने हटवण्याचे आणि ई-कॉमर्स साइट्सना 72 तासांच्या आत याचे उल्लंघन करणारी उत्पादने हटवण्याचे आदेश दिले आहेत.

गेल्या आठवड्यात गावस्कर यांच्या वकिलांनी व्यक्तिमत्व हक्कांच्या संरक्षणासाठी दिल्ली उच्च न्यायालयात अपील केले होते. या प्रकरणी पुढील सुनावणी 22 मे 2026 रोजी होईल. माजी भारतीय सलामीवीर गावस्कर आता समालोचन करतात. अनेक ई-कॉमर्स साइट्सनी त्यांच्या नावाचा आणि आवाजाचा गैरवापर केला होता.

गावस्कर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ई-कॉमर्स वेबसाइट्सद्वारे त्यांच्या नाव, फोटो आणि व्यक्तिमत्त्वाचा तसेच ओळखीचा अनधिकृत वापर थांबवण्यासाठी आणि पर्सनालिटी राइट्सचे संरक्षण करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

पर्सनालिटी राइट्स अंतर्गत, एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या फोटो, नाव किंवा ओळखीचे संरक्षण करण्याचा, त्यावर नियंत्रण ठेवण्याचा आणि त्यांच्या वापरामुळे लाभ मिळवण्याचा अधिकार असतो.

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांच्या आधी याच वर्षी मे महिन्यात अभिनेता जॅकी श्रॉफ देखील कोर्टात पोहोचले होते. त्यांनी आरोप केला होता की त्यांची प्रतिमा आणि व्हिडिओ बदलून परवानगीशिवाय वस्तू विकल्या जात आहेत. त्यावेळी कोर्टाने त्यांचे पर्सनॅलिटी आणि पब्लिसिटी राइट्स देखील सुरक्षित केले होते.

२०२३ मध्ये कोर्टाने अनिल कपूर यांची प्रतिमा, आवाज आणि त्यांचा 'झकास' हा कॅचफ्रेजचा गैरवापर थांबवला होता. तर, नोव्हेंबर २०२२ मध्ये अमिताभ बच्चन यांच्या पर्सनॅलिटी आणि पब्लिसिटी राइट्सना देखील संरक्षण देण्यात आले होते.

हे प्रकरण आता डिजिटल युगात सेलिब्रिटींच्या गोपनीयतेच्या आणि प्रसिद्धीच्या अधिकारांबाबत एक महत्त्वाचे उदाहरण ठरू शकते. पुढील सुनावणीत हे स्पष्ट होईल की न्यायालय तात्काळ कोणताही अंतरिम आदेश पारित करेल की नाही.

### एसीसी आणि ओरिएंट सिमेंटच्या विलिनीकरणास
## अंबुजा सिमेंटच्या संचालक मंडळाकडून मंजुरी

■ **अहमदाबाद :** भारताच्या सिमेंट उद्योगासाठी ऐतिहासिक ठरणाऱ्या या निर्णयात, अदाणी समूहातील कंपनी अंबुजा सिमेंट्स लिमिटेडच्या संचालक मंडळाने एसीसी लिमिटेड आणि ओरिएंट सिमेंट लिमिटेड यांचे अंबुजा सिमेंट्समध्ये विलिनीकरण करण्यासाठी दोन योजनांना मंजुरी दिली आहे.

या एकत्रीकरणाचा उद्देश मोठ्या प्रमाणावर, अधिक कार्यक्षम आणि स्पर्धात्मक असा वन सिमेंट प्लॅटफॉर्म उभारणे हा आहे. हे विलिनीकरण भारतातील सिमेंट क्षेत्रात एक दिग्गज कंपनी निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

यामुळे उत्पादन आणि लॉजिस्टिक्स नेटवर्कमध्ये सुधारणा, कॉर्पोरेट रचनेचे सुलभीकरण, बॅलन्स शीट अधिक मजबूत करणे तसेच वाढीसाठी कार्यक्षम भांडवली वाटप शक्य होणार आहे. नेटवर्क, ब्रँडिंग आणि विक्री प्रचाराशी संबंधित खर्चात कपात होऊन खर्च कमी होईल आणि मार्जिनमध्ये किमान १०० प्रति मेट्रिक टन सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

## वर्ल्डकप संघातून वगळलेला गिल विजय हजारे ट्रॉफी खेळणार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** भारताच्या एकदिवसीय आणि कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल विजय हजारे ट्रॉफी खेळणार आहे. पंजाबने स्पर्धेसाठी आपल्या 18 सदस्यीय संघाची घोषणा केली, ज्यात गिलसोबत अभिषेक शर्मा आणि अर्शदीप सिंग यांसारख्या मोठ्या नावांचाही समावेश आहे.

पंजाब आपल्या मोहिमेची सुरुवात 24 डिसेंबर रोजी महाराष्ट्राविरुद्ध करणार आहे. मात्र, गिल, अभिषेक आणि अर्शदीप किती सामने खेळू शकतील, याबाबतची स्थिती स्पष्ट नाही, कारण भारताला 11 जानेवारीपासून न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय आणि टी-20 मालिका खेळायची आहे.

गिलची निवड या कारणास्तवही महत्त्वाची मानली जात आहे, कारण त्याला नुकतेच भारताच्या आगामी टी-20 विश्वचषक संघातून आणि न्यूझीलंडविरुद्धच्या टी-20 मालिकेतून वगळण्यात आले होते. अशा परिस्थितीत, विजय हजारे ट्रॉफी गिलसाठी स्वतःला पुन्हा सिद्ध करण्याची, फॉर्ममध्ये परत येण्याची आणि व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये आपली गुणवत्ता दाखवण्याची मोठी संधी असेल.

पंजाब आपले सर्व सात लीग सामने जयपूरमध्ये खेळेल. मागील हंगामात उपांत्यपूर्व फेरीत बाहेर पडल्यानंतरही, यावेळी संघाला विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानले जात आहे. फलंदाजीमध्ये शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा यांच्याव्यतिरिक्त प्रभसिमरन सिंग, अनमोलप्रीत सिंग, नमन धीर, रमणदीप सिंग, सनवीर सिंग आणि हरप्रीत ब्रार संघाला खोली आणि मजबूती देतात.

गोलंदाजीची जबाबदारी पुन्हा एकदा अर्शदीप सिंगच्या खांद्यावर असेल. तो 2024-25 हंगामात पंजाबसाठी सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज होता. त्याला वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार आणि कृष्ण भगत साथ देतील.

## आयव्हीएफ उपचारातून वंध्यत्वावर मात शक्य



■ **नागपूर :** आजच्या जोडप्यांमध्ये वंध्यत्व ही मोठी समस्या आहे. भारतात १५ ते २० टक्के दाम्पत्य अपत्यसुखापासून वंचित राहत असून, योग्य मार्गदर्शन आणि आयव्हीएफ उपचारातून यावर सहज मात करणे शक्य असल्याची माहिती ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ बिर्ला आयव्हीएफचे सेंटर प्रमुख डॉ. प्रमोद येरणे यांनी दिली.

वंध्यत्वाच्या वाढत्या समस्येबद्दल बोलताना डॉ. येरणे म्हणाले, आजची तरुण पिढी खूप जास्त करिअरिस्टिक आहे. पॅकेजसच्या मागे धावत असताना लग्नाचे वय कधी उलटून जाते हे अनेकांच्या लक्षातही येत नाही. योसाबत बदलती लाइफस्टाइल, तरुण मुलींमध्ये वाढती व्यसनाधीनता ही वंध्यत्वाची प्रमुख कारणे असून, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात ही समस्या अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे डॉ. येरणे यांनी नमूद केले.

बिर्ला आयव्हीएफ सेंटरच्या माध्यमातून महिलांच्या जनजागृतीसाठी ठिकठिकाणी निःशुल्क शिबिरांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून महिलांना योग्य माहिती देऊन, आयव्हीएफ उपचारातून अपत्यप्राप्ती होऊ शकते हा विश्वास त्यांना दिला जातो. नागपूर, हिंगणघाट, बालाघाट, वरुड अशा अनेक ठिकाणी नियमित शिबिरांचे आयोजन केले जाते. आययूआई, आयव्हीएफ या तंत्रज्ञानातून निपुत्रिकांना मातृत्वसुख मिळवून देता येते. लग्नानंतर दोन वर्षे बाळ न झाल्यास तत्काळ आयव्हीएफ सेंटरमध्ये यावे. बरेच जण अनेक वर्षे प्रसूतीतज्ज्ञांकडे उपचार करून चाळीशी लोटल्यानंतर सेंटरमध्ये येत असल्याचे डॉ. येरणे यांनी सांगितले.

**व्यसनमुक्ती हाच उपाय**

वंध्यत्वासाठी महिला ४५ टक्के तर पुरुष ४० टक्के जबाबदार आहेत. महिला आणि पुरुषांमध्ये वाढती व्यसनाधीनता हेच याचे मुख्य कारण आहे. शहरी भागात सर्रास तरुणी धूम्रपान करताना दिसतात. याचा थेट परिणाम महिलांच्या अपत्यप्राप्तीवर होतो. यासोबतच वाढत्या तणावामुळे समस्या वाढत असल्याचे डॉ. येरणे यांनी सांगितले. भीती, दडपण, तणाव आणि व्यसनाधीनता ही वाढत्या वंध्यत्वाची कारणे आहेत.

## बीसीसीआयने वाढवली महिला क्रिकेटपटूंची घरगुती सामन्यांची फी



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) महिला क्रिकेटपटूंची देशांतर्गत सामन्यांची फी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

क्रिकबझच्या वृत्तानुसार, महिला खेळाडूंना आता एका प्रथम श्रेणी आणि एकदिवसीय सामन्यासाठी 50 हजार रुपये मिळतील. तर, एका टी-20 सामन्यासाठी 25 हजार रुपये दिले जातील. इउउक ने आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी महिला खेळाडूंची फी पुरुषांच्या बरोबरीने आधीच केली आहे.

बीसीसीआयने ऑनलाइन बैठक घेतली, ज्यात महिला खेळाडूंची फी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. आता देशांतर्गत क्रिकेटमध्ये महिला आणि पुरुष खेळाडूंना समान सामना फी दिली जाईल.

वनडे आणि फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये प्लेइंग-11 चा भाग असलेल्या खेळाडूंना 50 हजार रुपये मिळतील, तर बेंचवर बसलेल्या खेळाडूंना 25 हजार रुपये दिले जातील. टी-20 मध्ये प्लेइंग-11 मध्ये समाविष्ट खेळाडूंना 25 हजार रुपये दिले जातील, तर बेंचवर बसलेल्या खेळाडूंना 12,500 रुपये मिळतील.

यापूर्वी टी-20, वनडे आणि फर्स्ट क्लासमध्ये एका सामन्याच्या प्लेइंग-11 चा भाग बनल्यास महिला खेळाडूंना 20 हजार रुपयेच मिळत होते. तर बेंचवर बसलेल्या खेळाडूंना 10 हजार रुपये दिले जात होते.

वनडे आणि फर्स्ट क्लासमध्ये एका सामन्यासाठी आता 50 हजार रुपये मिळतील.


### बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| १३८ | ६९० | ४७७ | १९९ | ४९९ | १२० | १६९ | १२४ |
| ३४५ | ७८० | ३५० | २८९ | ६७९ | २४७ | ३४९ | १६० |
| २०० | ५०० | २७९ | ३७९ | २४६ | ३०० | २५९ | १७९ |

| जोडी | जोडी |
|---|---|
| २० - ५० - ८४ - ९४ | २९ - ३९ - ६६ - ७७ |
| २१ - ५१ - ८६ - ९६ | २२ - ३३ - ६८ - ७८ |
| २३ - ५३ - ८७ - ९७ | २१ - ३१ - ६५ - ७५ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २४ डिसें. २०२५

### बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

३१ - ४० - ५६ - ७६
३० - ४१ - ५९ - ७९
३२ - ४२ - ५८ - ७८
--------------------
१२० - १४९ - ५०० - २५०
२४७ - २५७ - ६९० - ३६८
६७० - ३४७ - ७८० - ४४९

**सर्व बाजारासाठी**

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९० | | ४८० | | २८८ | | ४०० | | ४७० | | २५८ | |
| २८० | ० | ५७० | २ | ४७७ | ८ | २६६ | ४ | ५६० | १ | ७८० | ५ |
| ३७० | | ६६० | | ३७८ | | ३३८ | | ३८० | | ३५७ | |

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६६ | | १६९ | | ९०० | | १४७ | | ६९० | | ३५० | |
| २३८ | ३ | २६८ | ६ | १८० | ९ | ३१० | २ | ७८० | ५ | ४४० | ८ |
| ४९० | | ३६७ | | २७० | | ६७९ | | ५०० | | ५५८ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
४ ० २ १ ८

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


### आजचे राशीभविष्य

**मेष :** तुमच्या सामाजिक सुधारणांच्या कामामुळे तुमचे शेजारी तुमची प्रशंसा करतील आणि त्यांना पूर्ण पाठिंबा देतील. देवी लक्ष्मीच्या रूपात नवीन पाहुण्यांचे आगमन तुमच्या घरात आनंदाचे वातावरण आणेल.

**वृषभ :** तुम्ही तुमच्या समस्या तुमच्या पालकांसोबत शेअर कराल. घराबाहेर शिक्षण घेणारे आज त्यांच्या कुटुंबियांना भेटू शकतात. कुटुंबातील सदस्यांसोबत धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हा.

**मिथुन :** आज तुमची सर्व कामे सहज पूर्ण होतील. संगीताची आवड असलेल्यांना आज एखाद्या मोठ्या कार्यक्रमात गाण्याची ऑफर मिळू शकते. आज तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाण्याचा बेत आखू शकता.

**कर्क :** आज तुम्ही जे काही कराल ते मनापासून करा. तुम्हाला एक नवीन अनुभव मिळेल. मानसिक समस्या दूर होतील, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल. तुमच्या सामाजिक ओळखी आणि आदर देखील वाढेल.

**सिंह :** तुमच्या मनाला शांती मिळेल. भावा, बहिणींचं प्रेम वाढेल, सपोर्ट मिळेल. नकारात्मक विचारांमुळे दुःखी वाटू शकेल. स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करा.

**कन्या :** कौटुंबिक सौहार्द टिकून राहील. आज तुमचे नशीब तुमच्या बाजूने असेल. तुम्ही बालपणीच्या मित्रा सोबत लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. सरकारी कार्यालयात काम करणाऱ्यांना पदोन्नती मिळू शकते.

**तुळ :** आज तुम्हाला समजुतदारपणे वागावे लागेल आणि त्यानंतरच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. तुमच्या वडिलांचे आशीर्वाद तुम्हाला मिळतील, ज्यामुळे तुमची सकारात्मकता वाढेल.

**वृश्चिक :** समाजसेवेत गुंतलेल्यांना समाजात अधिक प्रभाव मिळेल आणि तुम्हाला इतरांकडून पाठिंबा मिळेल. आज तुमच्या बोलण्यावर संयम ठेवा; कोणत्याही वादात अडकू नका.


**धनु :** आजचा दिवस धार्मिक कार्यात रस घेण्याचा असेल. तुम्ही धार्मिक कारणांसाठी मंडपाला भेट देऊ शकता. कलांमध्ये रस असलेल्यांना हा दिवस रोमांचक वाटेल. आज तुम्हाला मिळण्याची शक्यता आहे.

**मकर :** आज घरी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे आणि तुम्ही आनंदी वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. आरोग्याची काळजी घ्या; हवामानातील बदलांमुळे काही अस्वस्थता निर्माण होऊ शकते.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी बदलांनी भरलेला असेल. वडिलोपार्जित व्यवसायात असलेले लोक त्यांच्या वडिलांशी काही बदलांवर चर्चा करतील. वाहन चालवताना काळजी घेणे आवश्यक आहे.

**मीन :** आज तुमच्यावर कामाचा मोठा ताण असेल, त्यामुळे तुम्हाला आळस दूर करावा लागेल. अतिआत्मविश्वास तुमच्यासाठी हानिकारक असू शकतो. लोकांशी नीट वागा, नम्रतेने बोला.

## शब्दकोडे क्रमांक २३०७




**आडवे शब्द :-**
१) कमळ
३) नीच मनुष्य
६) फुरसद, संधी, मोका
८) उघड उघड
९) खोडातील द्रव
११) आगबोट
१२) चाणक्यनीती
१५) केस
१६) किंमत
१७) करमणूक
१८) चांगली वागणूक
२१) कशा प्रकारच्या
२२) लक्ष्मी
२४) प्रत्येक दिवशी
२६) उमर
२७) रेशमी धोतर
२८) दूर करणारा
३०) विहीरीतून पाणी काढण्याचे भांडे
३२) केर
३४) भक्कम, मजबूत
३६) पोते, गोणपाट
३९) गाय
४०) नवरदेव
४२) नेहमी
४३) गौरव
४४) हार, सर
४६) कुठल्या बाजूस
४८) नवरा
४९) पुरणे (जमिनीत)
५०) गवंडी
५२) जळलेले पीक
५३) शीळाच्या विरुद्ध
५४) अकस्मात
५६) बशीच्या बरोबरचे साधन
५९) एक रंगीत कंदमूळ
६०) उलट, विरुद्ध
६२) दार
६३) रांग, ओळ (हिंदी)

**उभे शब्द**
१) समाजात सुधारणा करणारा
२) म्हातारपणामुळे त्रासलेला
३) धर्माने युद्धात उच्चारलेले दोन अर्थाचे वाक्य
४) ढीग
५) जखमेवर लावायचा बाम
७) फावला वेळ
१०) शंकरावे एक नाव
१२) प्रामाणिक
१३) भेदणारा
१४) प्रत्येक वर्षी
१९) क्षमा
२०) पती-पत्नी
२३) नशा आणणारा
२५) धाक, भीती
२८) आधार नसलेला
२९) वेदनेने ओरडणे
३०) उदर
३१) व्यापार, व्यवसाय
३३) अतर्क्य गोष्ट घडणे
३५) हात
३७) सुंदर तरुणी
३८) घसा
४३) एक तारवाद्य
४४) नारळाचं झाड
४५) अनाचार
४७) कीर्तनकार
४८) फिरणे
४९) गवगवा
५१) लोक
५४) आगळेवेगळे
५५) काव्य
५७) पडणे, ऱ्हास
५८) निवासस्थान
६१) पंख


(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सावधान ! अस्वल आली पळा-पळा...

## चुरणी परिसरात अस्वलीची रात्र गस्त | गावागावांत दहशत



महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.23 )** – चुरणी व परिसरात सध्या अस्वलीच्या हालचाली वाढल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी रात्रीच्या सुमारास बेकाढाणा जवळ अस्वल दिसल्याची घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून रात्री घराबाहेर पडणे आणि शेतात जाणे धोकादायक ठरत आहे.

नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अस्वल शेतामधून मार्ग काढत चुरणीच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. त्यामुळे बेकाढाणा, चुरणीसह लगतच्या गावांमध्ये सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. बेकाढाणा परिसरात रात्रीच्या वेळी शेतकरी व मजूर शेतात ये-जा करतात. अशातच अस्वल दिसल्याची बातमी पसरताच नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

### अस्वलीचे वारंवार दर्शन

मागील काही दिवसांपासून या भागात कधी शेतात, कधी गावाच्या वेशीवर, तर कधी वस्तीजवळ अस्वल दिसत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. विशेषत: पहाटे व रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या भीतीचा सामना करावा लागत आहे. महिला, वृद्ध आणि लहान मुलांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

### मानव-वन्यजीव संघर्षाचा धोका

सध्या गव्हाची पेरणी सुरू असून शेतकरी दिवसरात्र शेतात पाणी देण्यासाठी जात आहेत. अस्वल मानवी वस्तीकडे येऊ लागल्याने मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे जीवितहानी व आर्थिक नुकसान होण्याचा धोका नाकारता येत नाही.

### वनविभागाकडे ठोस कारवाईची मागणी

या घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी केली आहे. अस्वलीला पकडून सुरक्षितपणे जंगलात सोडावे, परिसरात रात्रीची गस्त वाढवावी तसेच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांनी घाबरून एकट्याने शेतात जाऊ नये, रात्री बाहेर पडताना टॉर्चचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. यापूर्वीही या परिसरात अस्वलीच्या हल्ल्याच्या घटना घडल्याच्या आठवणी ताज्या असल्याने भीती अधिक वाढली आहे. वनविभागाने गांभीर्याने दखल घेऊन प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, हीच नागरिकांची ठाम मागणी आहे.

# सक्षम अंगणवाडी परसबाग योजनेत निधीचा गैरवापर ?

## चौकशीची मागणी, प्रशासनावर दबाव वाढला

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 23 )** – बालकांचे पोषण सुधारणे आणि ग्रामीण महिलांच्या सहभागातून अंगणवाड्यांना स्वयंपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारी *सक्षम अंगणवाडी परसबाग योजना* चांदूर बाजार तालुक्यात वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेल्या निधीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, स्वतंत्र व पारदर्शक चौकशीची मागणी जोर धरत आहे.

मार्गदर्शक सूचनांनुसार परसबाग विकास, लागवड व देखभालीसाठी निधी वापरणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मात्र त्रयस्थ व्यक्तींमार्फत कामे झाल्याचे दाखवून निधी वळविण्यात आल्याचा आरोप



आहे.

विशेषत: के. जी. पाचपुते, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी (एकात्मिक बालविकास सेवा योजना, चांदूर बाजार) यांच्या कार्यकाळात हे प्रकार घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हा प्रकार केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नसून शासकीय निधीचा जाणीवपूर्वक अपहार असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याप्रकरणी आर्थिक व्यवहारांची चौकशी, सर्व अंगणवाड्यांच्या परसबाग कामांची स्थळ तपासणी, बिले व बँक व्यवहारांची पडताळणी तसेच दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. बालकांच्या पोषणाशी थेट संबंधित असलेल्या या योजनेतील आरोप गंभीर असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# गुणवंत बाबाची 32 वी पुण्यतिथी महोत्सव

## सप्ताहभर धार्मिक उत्साहाची रेलचेल

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.23 )** – तालुक्यातील अंबाडा येथील श्री संत गुणवंत बाबा टेकडी दरबारात श्री संत गुणवंत बाबांचा 32 वा पुण्यतिथी महोत्सव दि. 14 ते 21 डिसेंबर 2025 या कालावधीत भक्तिभाव, श्रद्धा व उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. सप्ताहभर परिसर रामनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. महोत्सवात ह.भ.प. संजय महाराज यांच्या सुमधुर वाणीत श्रीरामकथा झाली. रामचरित्रमानसातील विविध प्रसंगांचे भावपूर्ण कथन व कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. सप्ताहकाळात काकडा आरती, हरिपाठ, रामधून तसेच दररोज अन्नदानाचे आयोजन करण्यात आले. दि. 20 डिसेंबर रोजी



ग्रंथपूजा व सायंकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. दि. 21 डिसेंबर रोजी गोपाळकाल्याच्या कीर्तनानंतर सुमारे दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी श्री गुणवंत बाबा सेवा समिती व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# गॅस गळती रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे 'मॉकड्रिल'





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.23 )**– कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनामार्फत आज लोणी येथील अदानी टोटल गॅस सीएनजी (भागवत पंप) केंद्रावर सुरक्षा लेव्हल-3 मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम पार पडली.

या मॉकड्रिलमध्ये गॅस गळतीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास घ्यावयाची खबरदारी, सायरन वाजवून धोक्याची सूचना देणे, प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करणे आणि बाधितांना त्वरित प्रथमोपचार देऊन सुरक्षितस्थळी हलवणे या बाबींचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले. अदानी टोटल गॅसच्या तांत्रिक पथकाने या वेळी आपत्कालीन नियोजनाचे बारकावे समजावून सांगितले.

या मोहिमेत महसूल विभाग, नांदगाव खंडेश्वरचे तहसीलदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी आणि जिल्हा शोध व बचाव पथकाचे जवान सहभागी झाले होते. तसेच अमरावती अग्निशमन विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालयाची रुग्णवाहिका यंत्रणा आणि लोणी पोलीस स्टेशनचे अधिकारी-कर्मचारी यांनी समन्वयाने काम केले. या प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ, अदानी गॅसचे संचालक व व्यवस्थापक, आपदा मित्र, आपदा सखी, लोणीचे सरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा उपक्रमांमुळे आपत्तीच्या काळात जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी यंत्रणांमधील समन्वय अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

# माझी शेती-माझा सातबारा, मीच नोंदविणार माझा पीक पेरा!

**मोर्शी, ( दि.23 )**– शासनामार्फत सध्या रब्बी हंगामातील पिकांची ई-पीक पाहणी मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. रब्बी हंगामात घेतली जाणारी गहू, चणा, हरभरा, तूर तसेच इतर पिकांची अचूक नोंद ई-पीक पाहणी प्रणालीद्वारे करणे सर्व शेतकऱ्यांसाठी अनिवार्य करण्यात आले आहे. शासनाच्या माझी शेती – माझा सातबारा, मीच नोंदविणार माझा पीक पेरा या संकल्पनेनुसार प्रत्येक शेतकऱ्याने स्वत:च्या मोबाईल फोनच्या माध्यमातून आपल्या शेतातील पीक पेऱ्याची नोंद करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वेळेत व अचूक नोंद झाल्यास शेतकऱ्यांना किमान हमीभावाने (एमएसपी) शासकीय खरेदीचा लाभ, अतिवृष्टी अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी नुकसानभरपाई तसेच विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. ई-पीक पाहणी नोंद करताना अडचणी येणाऱ्या शेतकऱ्यांनी नजीकच्या सेतू सुविधा केंद्र, तलाठी कार्यालय किंवा कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा, असेही सूचित करण्यात आले आहे. मोर्शी तहसील कार्यालयामार्फत सर्व शेतकऱ्यांनी शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करून विहित कालावधीत ई-पीक पाहणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वेळेवर नोंद ही शेतकऱ्यांच्या हक्कांची सुरक्षितता राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतले बँकिंगचे धडे



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.23 )**– शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथील विद्यार्थी शैक्षणिक अभ्यासासोबतच विविध उपक्रमांतही उत्स्फूर्त सहभाग घेत असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. नुकतीच या शाळेच्या विद्यार्थ्यांनी अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेला शैक्षणिक भेट देऊन प्रत्यक्ष बँकिंग व्यवहारांची माहिती घेतली.

विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहारांची मूलभूत समज निर्माण व्हावी तसेच बँकिंग व्यवस्था कशी कार्यरत असते, याची प्रत्यक्ष माहिती मिळावी या उद्देशाने या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बँकेतील विविध विभाग, व्यवहारांची पद्धत, खात्यांचे प्रकार, कर्ज प्रक्रिया तसेच आधुनिक बँकिंग सेवा यांची माहिती घेतली. अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक खडकर तसेच बँकेतील अन्य कर्मचाऱ्यांनी बँकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतची वाटचाल व बँकेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रत्येक विभागाचे कार्यही त्यांनी सुलभ भाषेत समजावून सांगितले. या शैक्षणिक उपक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख व उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांसोबत डी. डी. सुखदेव व मंगेश मरस्कोले उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना व्यावहारिक ज्ञानाचा लाभ झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# प्रभाग चौदाव्याने भाजपच्या उमेदवारांना दिली निर्णायक आघाडी

## शहरात एकच चर्चा : नगराध्यक्ष पदाच्या लढतीत 124 मतांनी निसटता विजय



महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.23 )** – अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या नव्वद वर्षांच्या इतिहासात यंदाची निवडणूक सर्वाधिक चुरशीची ठरली. थेट जनतेतून निवड होणाऱ्या नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या सहा फेरींच्या मतमोजणीत प्रत्येक फेरीत राजकीय समीकरणे बदलत होती. कधी भाजप तर कधी काँग्रेस आघाडी घेत असल्याने मतमोजणीदरम्यान थरारक वातावरण निर्माण झाले होते.

अखेर अटीतटीच्या सहाव्या व अंतिम फेरीत भाजपचे उमेदवार अविनाश गायगोले यांनी काँग्रेसच्या उमेदवार आयशाबनो रशीद खां यांच्यावर 124 मतांची आघाडी घेत निसटता विजय मिळवला. या विजयामागे प्रभाग क्रमांक 14 निर्णायक ठरल्याची चर्चा शहरभर सुरू आहे. या प्रभागातून नगरसेविका पदासाठी निवडून आलेल्या प्रियंका शंकर मालठाणे यांनी भरघोस मतांची आघाडी घेत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा लीड तोडत विजयाचा मार्ग सुकर केला. त्यामुळे त्या 'किंग मेकर' ठरल्याचे बोलले जात आहे.

### निवडणूक इतिहासात लक्षात राहण्यासारखी

रविवारी (ता. 21) नगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या मतमोजणीत शहरातील 14 प्रभागांतील 28 नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी सहा फेऱ्यांमध्ये मतमोजणी झाली. पहिल्या दोन फेऱ्यांत भाजप व शिंदे गटात लढत दिसून आली. तिसऱ्या व चौथ्या फेरीत काँग्रेसने आघाडी घेत भाजपला जोरदार टक्कर दिली, तर पाचव्या फेरीत काँग्रेस 411 मतांनी आघाडीवर होती. अंतिम फेरीत भाजपचे अविनाश गायगोले यांना एकूण 10,181 मते, तर काँग्रेसच्या आयशाबनो रशीद खां यांना 10,057 मते मिळाली. उबाठा गटाचे यश लवटे तिसऱ्या क्रमांकावर (6,132 मते) तर शिंदे गटाच्या डॉ. स्पृहा डकरे चौथ्या क्रमांकावर (5,594 मते) राहिल्या. नगराध्यक्ष पदासह काही प्रभागांत बारा ते अठरा मतांच्या फरकाने निकाल लागल्याने ही निवडणूक इतिहासात लक्षात राहणारी ठरली आहे. मात्र, प्रभाग चौदाव्याने भाजपची शान राखली हीच चर्चा सध्या शहरात सर्वत्र ऐकू येत आहे.

# पेपर कपांचा वापर टाळा, रोगराईला बसेल आळा!

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि.23 )** – दैनंदिन जीवनात चहा, कॉफी पिण्यासाठी पेपर कपांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. विशेषत: चहाच्या टपऱ्या, लहान-मोठी हॉटेल्स व कॅन्टीनमध्ये काचेचे ग्लास व चिनी मातीच्या कपांची जागा आता पेपर कपांनी घेतली आहे. कोरोना काळानंतर ही पद्धत अधिक रूढ झाली. मात्र, सोयीच्या नावाखाली होणारा हा वापर मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका ठरत आहे.

पेपर कप हे कागदापासून बनविलेले असले तरी गरम पेयामुळे ते ओले होऊ नयेत म्हणून त्यांच्या आत पॉलीथिनचे आवरण असते. गरम चहा ओतल्यावर हे आवरण वितळून मायक्रोप्लास्टिक तयार होते, जे थेट शरीरात प्रवेश करते. अभ्यासानुसार एका कप चहासोबत हजारो मायक्रोप्लास्टिक कण शरीरात जातात. यामुळे हृदयविकार, कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. मधुमेह किंवा आधीच रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होऊ शकतो.




याशिवाय रस्त्यावर फेकलेले पेपर कप मोकाट जनावरे चघळतात. त्यामुळे त्यांचे पोट फुगून अनेक जनावरे दगावण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे पेपर कपांचा वापर टाळून काचेचे ग्लास किंवा चिनी मातीच्या कपांचा वापर करणे आवश्यक आहे. नागरिकांसह शासनानेही याची गंभीर दखल घेऊन मानवी व पर्यावरणीय आरोग्याच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# यकृताचा कर्करोग वाढतोय!



यकृत हा शरीराचा एक अतिशय महत्त्वाचा अवयव आहे. तो रक्त शुद्ध करतो, शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकतो. अन्न पचण्यास मदत करतो आणि शरीराला ऊर्जा देणारे अनेक आवश्यक घटक तयार करतो. याशिवाय यकृत मेटॅबॉलिझमदेखील नियंत्रित करते. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे यकृत निकामी झाल्यानंतरही सुरुवातीच्या काळात कोणतीही स्पष्ट लक्षणे नसतात. यामुळेच यकृताच्या कर्करोगाचे अनेकदा उशिरा निदान होते.

यकृत आणि पाचक प्रणालीशी संबंधित कर्करोगाची लक्षणे फारशी खास नाहीत. अर्थात, यकृत कर्करोगात दिसणारी लक्षणे गॅस, ॲसिडिटी, किंवा संसर्ग इतर सामान्य आजारांमध्येदेखील दिसू शकतात. या कारणास्तव लोक यालक्षणांकडे दुर्लक्ष करतात आणि वेळेवर चाचणी करत नाहीत.

यकृताच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे हळूहळू दिसून येतात. पहिले लक्षण म्हणजे भूक न लागणे. त्या व्यक्तीला खाण्याची इच्छा होत नाही आणि जेवण पाहून विचित्र वाटते. दुसरे लक्षण सतत मळमळ आणि उलट्या असू शकते. तिसरे प्रमुख लक्षण म्हणजे शरीराचा पिवळेपणा. त्याला कावीळ म्हणतात. यामध्ये डोळे आणि त्वचेचा रंग पिवळा होऊ लागतो.

**इशारा**
**डॉ. सतीश सोनवणे**

यकृत पोटाच्या वरच्या उजव्या बाजूला आहे. या भागात सतत वेदना, जडपणा किंवा ताण येत असेल तर ते यकृताशी संबंधित समस्येचे लक्षण असू शकते. तथापि, ही वेदना गॅस किंवा पोटाच्या इतर आजारां ध्येदेखील उद्‌भू शकते, म्हणून केवळ वेदनांच्या आधारे स्वतः हून कर्करोग असल्याची धारणा करून घेणे योग्य नाही.

**लवकर निदान नाही**

यकृत हा मजबूत अवयव असून त्याचे ८० ते ९० टक्के नुकसान झाले, तरी अनेक वेळा त्याची स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत. म्हणूनच रोग जास्त वाढत नाही तोपर्यंत शरीर फारसे संकेत देत नाही. यामुळेच यकृताचा कर्करोग बर्‍याचदा शेवटच्या टप्प्यात आढळतो.

**डॉक्टरांना कधी भेटावे?**

उलट्या, पोटात सतत दुखणे, भूक न लागणे, अशक्तपणा, वजन कमी होणे किंवा फिकटपणा यासारखी पोटाची कोणतीही समस्या दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ राहिली आणि औषध घेतल्यानंतरही बरे होत नसेल, तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. अशा परिस्थितीत, त्वरित चांगल्या डॉक्टरांकडून तपासणी करणे खूप महत्वाचे आहे. यकृताच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून वाचण्याचा उत्तम मार्ग म्हणजे वेळेवर तपासणी करणे. विशेषत: ज्यांना फॅटी लिव्हर, हिपॅटायटीस, अल्कोहोलचे व्यसन, मधुमेह किंवा लठ्ठपणाची समस्या आहे. त्यांनी नियमित लिव्हरची तपासणी करत राहिले पाहिजे. यासह, यकृताच्या कोणत्याही मोठ्या समस्येचे निदान सुरुवातीच्या अवस्थेत होऊ शकते.

# रुग्णालयात कुठे हात लावू नये?



रुग्णालयातील आप्तांना भेटण्यासाठी आपण जातो. रुग्णालयात स्वच्छतेची पुरेशी काळजी घेतली जाते, असा समज असतो. मात्र, रुग्णालयाचा कोपरा न कोपरा स्वच्छ असतो असं नाही. रुग्णालयात विविध विकार जडलेले रुग्ण असतात. त्यांना भेटायला येणाऱ्या लोकांची गर्दी असते. अशा परिस्थितीत या ठिकाणी जंतूंचा वास असतो. त्यामुळे रुग्णालयात जाणाऱ्यांनी आणि घरी आल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्यावेत. इतकंच नाही, तर रुग्णालयातल्या काही गोष्टींना हात लावताना काळजी घ्यायला हवी.

* रुग्णालयाच्या लिफ्टमध्ये रुग्णांची ने-आण होते. डॉक्टर, नर्सची ये-जा सुरू असते. अशा स्थितीत लिफ्टच्या बटणांवर जंतूंचा वास असू शकतो. त्यामुळे रुग्णालयातल्या लिफ्टचं बटण दाबताना टिश्यू पेपरचा वापर करा. लिफ्टमधून बाहेर पडल्यावर हॅंड सॅनिटायझर वापरा.
* रुग्णाच्या खोलीत शिरताना आपण हॅंडेलला हात लावतो. हॅंडलवर प्रचंड बॅक्टेरिया असतात, असं संशोधनातून दिसून आलं. खोलीबाहेर पडल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्या.
* रुग्णालयात भेटीसाठी आलेल्यांसाठी खुर्च्या ठेवलेल्या असतात. त्यावरही जंतू साठलेले असतात. खुर्च्यांच्या हातांवर जंतू असतात. त्यामुळे खुर्चीवर बसण्याआधी ॲंटिबायोटिक वाईपचा वापर करा.
* रुग्णाच्या खोलीतल्या आयव्ही पोल्सवर जंतूंचा वास असतो. त्यामुळे या पोल्सना हात लागल्यास हात स्वच्छ धुवून घ्या.
* रुग्णालयातल्या नळांना हात लावताना काळजी घ्या. हात धुतल्यानंतर नळ बंद करताना टिश्यू किंवा रुमालाचा वापर करा.

**आपण कुठे चुकतो?**

# थंडीत घ्या विशेष काळजी

**ऋतूबदल**
**डॉ. प्रसन्न नेने**

हिवाळा मुलांसाठी अनेक त्रास घेऊन येतो. त्यामुळे केवळ त्यांनाच नाही, तर त्यांच्या पालकांनाही त्रास होतो. थंड वारे, तापमानात घट आणि बदलते हवामान यामुळे मुलांची प्रतिकारशक्ती कम कुवत होते. परिणामी, त्यांना सर्दी, खोकला, ताप आणि विषाणूजन्य संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते.




हिवाळ्यात लहान मुलांची विशेष काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. हंगामी आजारांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी अन्नापासून कपड्यांपर्यंत सर्व गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. या काळात विशेषत: सर्दी, खोकला आणि घशाच्या समस्या, त्वचेचा निस्तेजपणा आणि कोरडेपणा, तापासारखे विषाणूजन्य आजार, डोकेदुखी, पोटाच्या समस्या, फ्लू विषाणू (इन्फ्लूएंझा) चा धोका, फुफ्फुसांचे आजार या समस्या डोके वर काढतात. हिवाळा जवळ येताच, पालकांनी त्यांच्या मुलांच्या आहारात 'क' जीवनसत्वाचे प्रमाण वाढवावे. 'क' जीवनसत्व त्यांच्या रोगप्रतिकारक पेशींना सक्रिय ठेवते. संत्री, गोड लिंबू, आवळा, किवी, लिंबू, टोमॅटो आणि सिमला मिरची या फळांमध्ये आणि भाज्यांमध्ये हे जीवनसत्व सर्वाधिक प्रमाणात आढळते. मुलांसाठी 'ड' जीवनसत्वदेखील आवश्यक असते. हाडे मजबूत करण्यासाठी त्यांना दररोज थोडा वेळ उन्हात खेळू द्या. मुलांना उबदार आणि पौष्टिक अन्न द्या. हिवाळ्यात मुलांच्या शरीराला अतिरिक्त ऊर्जा आणि उष्णतेची आवश्यकता असते, म्हणून त्यांना या गोष्टी खाण्यास प्रोत्साहित करा.

हिवाळ्यात, तहान कमी होते. त्यामुळे घसा कोरडा होऊ शकतो आणि चेहरा खडबडीत होऊ शकतो. मुलांना नियमित अंतराने हायड्रेटेड ठेवा. पुरेसे कोमट पाणी, हर्बल पाणी (आले, तुळस, दालचिनी) रोगप्रतिकारक पेशी सक्रिय ठेवते आणि संसर्गापासून संरक्षण करते.

**हिवाळ्यात मुलांसाठी शारीरिक हालचाली महत्त्वाच्या**

थंडीमुळे, पालक अनेकदा मुलांना बाहेर खेळण्यापासून रोखतात. ते चुकीचे आहे. यामुळे त्यांचे रक्ताभिसरण मंदावते, ऊर्जा कमी होते आणि त्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत होते.

# हार्मोन्सच्या असंतुलनाकडे दुर्लक्ष नको




**आरोग्यमंत्र**
**डा. मेघा पठारे**

ऑफिसचे काम, घराची जबाबदारी, मुलांची काळजी, ताण यांसारख्या गोष्टींमुळे महिलांना स्वत:कडे लक्ष देण्यासाठी वेळच नसतो. अशात त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. कोणत्याही कारणास्तव हार्मोन्सची पातळी खूप जास्त किंवा खूप कमी होते तेव्हा त्याला हार्मोनल असंतुलन म्हणतात. या बदलांचे परिणाम हळूहळू दिसून येतात आणि बरेच लोक सामान्य थकवा किंवा ताण समजून त्याकडे दुर्लक्ष करतात, पण वेळेत लक्ष न दिल्यास वजन वाढणे, अनियमित मासिक पाळी, त्वचेच्या समस्या आणि मूड स्विंग्ज यासारख्या समस्या उद्‌भू शकतात.

हार्मोनल असंतुलन अनेक कारणांमुळे होऊ शकते. जीवनशैलीतील बदल हे सर्वात मोठे कारण आहे. निकृष्ट आहार, झोपेचा अभाव, सततचा ताण, गर्भधारणा, पीसीओएस, रजोनिवृत्ती आणि थायरॉईड या समस्यांदेखील हार्मोनल असंतुलन निर्माण करू शकतात. जास्त जंक फूड, साखरेचे पदार्थ, कमी शारीरिक हालचाल, लठ्ठपणा, जळजळ, जास्त औषधे, जास्त कॅफिन किंवा अल्कोहोल आणि अनियमित दिनचर्या या सर्वांमुळे हार्मोनल प्रणालीवर परिणाम होतो. प्लास्टिकमध्ये आढळणारी बीपीए सारखी पर्यावरणीय रसायने शरीराच्या अंतःस्रावी प्रणालीवरदेखील परिणाम करतात.

हार्मोनल बदलांमुळे विविध लक्षणे उद्‌भू शकतात. सर्वात सामान्य लक्षण म्हणजे सतत थकवा येणे. अचानक वजन वाढणे किंवा कमी होणे हेदेखील एक महत्त्वाचे लक्षण आहे. महिलांमध्ये अनियमित मासिक पाळी, मुरुमे वाढणे, केस गळणे किंवा अवांछित केसांची वाढ. हे सर्व हार्मोनल समस्यांचे परिणाम असू शकतात. मूड स्विंग, चिडचिडेपणा, चिंता, नैराश्य यासारख्या भावनिक समस्यादेखील हार्मोन्सशी संबंधित असू शकतात. निद्रानाश, जास्त झोप येणे, भुकेत अचानक बदल, पचनाच्या समस्या, चेहऱ्यावर सूज येणे, वारंवार डोकेदुखी हीदेखील महत्त्वाची लक्षणे आहेत. ही लक्षणे दीर्घकाळ टिकून राहिली तर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# अंडाशयाच्या कर्करोगाविषयी...



गेल्या काही वर्षांमध्ये बऱ्याच बॉलिवूड कलाकारांना कॅन्सरचं निदान झालं. अभिनेत्री नफिसा अली यांनाही अंडाशयाचा कॅन्सर झाला होता. कॅन्सरच्या या प्रकाराविषयी जाणून घेऊया. सर्वसाधारणपणे रजोनिवृत्ती झालेल्या पन्नाशीच्या पुढच्या महिलांना अंडाशयाच्या कॅन्सरचा धोका असतो. पण काही महिलांना तरुण वयातही अंडाशयाचा कॅन्सर होऊ शकतो. या कॅन्सरचं निदान लवकर होत नाही. त्यामुळे कॅन्सरच्या पुढच्या टप्प्यांमध्येच त्याची लक्षणं दिसून येतात. सुरुवातीच्या टप्प्यात या कॅन्सरची कोणतीही लक्षणं दिसून येत नसल्याने अखेरच्या टप्प्यांमध्ये त्याचं निदान होतं आणि महिलेला खूप मोठा धक्का बसतो.

पोटात सूज येणं, वारंवार लघवीला जावं लागणं, भूक मंदावणं, पोट लवकर भरणं, ओटीपोटाच्या भागात सतत अस्वस्थता जाणवणं, तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहणारी पोटदुखी.

**आरोग्यवेध**

कुटुंबात अंडाशय किंवा स्तनांच्या कॅन्सरचा इतिहास असेल तर धोका अनेकपटींनी वाढतो. या कॅन्सरचं वैशिष्ट्य असं कोणतंही लक्षण नसलं तरी हार्मोन्समुळे जनुकांच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे अंडाशयाच्या कॅन्सरचा धोका वाढतो. हार्मोन रिप्लेसमेंट थेरेपीमुळे कॅन्सरचा धोका वाढतो. यासोबतच एंडोमेट्रिओसिस हा विकार असेल तर अंडाशयाचा कॅन्सर होऊ शकतो. स्थूलपणाही या विकाराला कारणीभूत ठरू शकतो. नफिसा यांना पेरिटोनियल कॅन्सरचंही निदान झालं आहे. हा कॅन्सर अंडाशयाच्या कॅन्सरपेक्षा पूर्णपणे वेगळा असला तरी या दोघांची लक्षणं एकसारखीच असतात. हा कॅन्सर अत्यंत दुर्मीळ आहे. पण अंडाशयाच्या कॅन्सरसोबत तो वाढू शकतो. हा कॅन्सर अंडाशयाच्या कॅन्सरप्रमाणे पसरत असल्यामुळे या दोन्ही प्रकारच्या कॅन्सरचा एकमेकांशी संबंध जोडण्यात आला आहे. या दोन्ही प्रकारच्या कॅन्सरचा सामना करणं खूप कठिण असतं.

दोन्ही प्रकारच्या कॅन्सरमुळे शरीराचं किती नुकसान झालं आहे यावर उपचारांची दिशा अवलंबून असते. कॅन्सर किती पसरला आहे, रुग्णाचं वय, कॅन्सरचा टप्पा, रुग्णाचं आरोग्य यावर बरंच काही अवलंबून असतं. रुग्णाला केमोथेरेपी द्यायची की शस्त्रक्रिया करायची याचा निर्णय घेताना डॉक्टर या सर्व बाबींचा विचार करतात. सर्वसाधारणपणे डॉक्टर शस्त्रक्रियेचा मार्ग सुचवतात. केमोथेरेपी हा दुसरा पर्याय असतो.

# धोका मायक्रोप्लास्टिक्सचा!

रोजच्या धावपळीत, आपण अनेकदा पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या खरेदी करतो किंवा जुन्या बाटल्या धुवून त्यांचा पुन्हा पुन्हा वापर करतो. या बाटल्या निरुपद्रवी वाटू शकतात, परंतु त्यांचे छुपे धोके आपल्या आरोग्याला आणि पर्यावरणाला हानी पोहोचवत आहेत.

सर्वात चिंताजनक गोष्ट म्हणजे या बाटल्यांमधून आपल्या पिण्याच्या पाण्यात मायक्रोप्लास्टिक्स येतात. मायक्रोप्लास्टिक्स हे प्लास्टिकचे सूक्ष्म कण आहेत. त्यांचा आकार पाच मायक्रॉनपेक्षा कमी असतो. ते आपल्या जलस्रोतांमध्ये विविध प्रकारे प्रवेश करतात. त्यात जुन्या प्लास्टिकचे विघटन, कपड्यांमधून मायक्रोफायबरचा प्रवाह आणि बाटल्यांची झीज यांचा समावेश असतो. आज, केवळ महासागरेच नाही तर नद्या, तलाव आणि हवादेखील मायक्रोप्लास्टिक्सने भरलेली आहे.



**हे टाळा**
**डॉ. महेश दळे**

**मायक्रोप्लास्टिक्सचा शरीरावर कसा परिणाम होतो?**

आपण प्लास्टिकच्या बाटल्यांमधून पाणी पितो, तेव्हा अनवधानाने हे लहान कण गिळतो. अनेक आंतरराष्ट्रीय अभ्यासांमध्ये बाटलीबंद पाण्यात मायक्रोप्लास्टिक्स आढळून आले आहेत. त्यांच्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे. प्लास्टिकमधील काही रसायने शरीरात प्रवेश करतात आणि हार्मोनल असंतुलन, लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिरोधकता, प्रजननक्षमतेवर परिणाम करतात. काही प्रकरणांमध्ये कर्करोगासारखे आणखी नुकसान करतात. या कणांच्या दीर्घकालीन परिणामांवर संशोधन चालू असताना, मायक्रोप्लास्टिक्समुळे जळजळ, ऑक्सिडेटिव्ह ताण आणि हानिकारक रसायनांचे हस्तांतरण होऊ शकते, असे स्पष्ट झाले आहे.

**आपण काय करू शकतो?**

राष्ट्रीय आरोग्य संस्थेने (एनआयएच) ने या विषयावर एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. प्रथम प्लास्टिकच्या बाटल्या सोडून द्या आणि स्टील, काच किंवा बीपीएमुक्त बाटल्या वापरा. दुसरे म्हणजे, पाण्यातील दूषित घटक, विशेषतः मायक्रोप्लास्टिक्स कमी करू शकणारी वॉटर फिल्ट्रेशन सिस्टम वापरा. प्रत्येक फिल्टर परिपूर्ण नसतो; परंतु सुधारित तंत्रज्ञानासह फिल्टर मायक्रोप्लास्टिक्सचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान कमी गंभीर नाही. प्रत्येक टाकून दिलेली बाटली सागरी जीवन, नद्या आणि संपूर्ण परिसंस्थांना हानी पोहोचवते. त्यामुळे प्लास्टिक कचऱ्याची समस्या आणखी वाढते.

# विल्सन डिसिजविषयी...



विल्सन्स डिसिज नावाचा एक विकार आहे. अत्यंत दुर्मीळ असा हा विकार आहे. या विकारात मेंदू, यकृत आणि इतर महत्त्वाच्या अवयवांमध्ये तांबं साठून राहतं. 'विल्सन्स डिसिज' हा एक अनुवंशिक आजार आहे. जगभरात ३० हजारांमध्ये एका व्यक्तीला हा आजार होतो. विल्सन्स डिसिज झालेले बरेच रुग्ण ५ ते ३५ या वयोगटातले असतात. तांबं हे शरीराला आवश्यक असं खनिज आहे. अन्नातून शरीराला तांबं मिळतं. अन्नातलं तांबं शरीर शोषून घेतं. शरीरातलं अतिरिक्त तांबं पित्तातून बाहेर पडतं. हे तांबं विविध अवयवांमध्ये साचून राहणं आणि योग्य पद्धतीने बाहेर न पडणं ही विल्सन डिसिजची लक्षणं आहेत. वेळेत निदान झालं तर या विकाराने त्रस्त रुग्ण सर्वसामान्य आयुष्य जगू शकतो. विल्सन डिसिज कोणत्या अवयवाला झाला यावरून लक्षणं ठरतात. या विकाराची लक्षणं इतर काही विकारांसारखी असतात. त्यामुळे बरेचदा गैरसमज होऊ शकतो. त्यामुळे योग्य तपासणी करून डॉक्टरांकडून याचं निदान करून घ्यायला हवं.

**व्याधी विचार**

यकृतात तांबं साठून राहत असेल तर मळमळणं, वजन कमी होणं, उलट्या, अशक्तपणा, अस्वस्थता, कावीळ, पोट फुगणं, भूक मंदावणं आणि स्नायूंमध्ये गोळे येणं अशी लक्षणं आढळतात. मेंदूत तांबं साठत असेल तर अर्धशिशी, दृष्टिदोष, बोलताना अडखळणं, विस्मरण होणं, झोपेत अडथळे, नैराश्य अशी लक्षणं आढळतात. मेंदूत तांबं साठून राहण्याची स्थिती पुढच्या टप्प्यात गेली तर चक्कर येणं, स्नायू दुखणं अशी लक्षणं दिसून येतात. शरीरातल्या इतर अवयवांमध्ये तांबं साठून राहत असेल तर मासिक पाळी अनियमित होणं, मूतखडा, आर्थ्रायटिस, रक्तदाब कमी होणं, नखांचा रंग बदलणं, हाडांची घनता कमी होणं अशी लक्षणं दिसून येतात. मुलाला आई आणि वडिलांकडून एटीपी ७ बी हे जनूक मिळालं तर ते विल्सन्स डिसिजला कारणीभूत ठरतं. हे जनूक पालकांच्या माध्यमातून त्यांच्या मुलांपर्यंत पोहोचतं.

दोन्ही पालकांमध्ये हे जनूक असेल तर ते मुलांमध्ये येण्याची शक्यता २५ टक्के असते. जनुकीय चाचणी करून विल्सन्स डिसिजचा धोका ओळखता येऊ शकतो. या विकाराचं वेळीच निदान होणं गरजेचं असतं. तसं झालं नाही किंवा योग्य औषधोपचार झाले नाहीत तर लिव्हर सिऱ्होसिस, यकृत निकामी होणं, मेंदूशी संबंधित, किडनीशी संबंधित समस्या, मानसिक आजार, रक्तविकार उद्‌भू शकतात.

**नवसंशोधन**

## वाहतुकीच्या आवाजामुळे वाढतो स्थूलपणा!



रस्त्यावरच्या वाहतुकीच्या आवाजामुळे स्थूलपणाचा धोका वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. 'द बार्सिलोना इंस्टीट्यूट ऑफ ग्लोबल हेल्थ स्टडीज' तर्फे हा अभ्यास करण्यात आला आहे. याआधीही अशा प्रकारचा अभ्यास करण्यात आला होता. त्यातूनही वाहनांचा वाढता आवाज आणि स्थूलत्व यांचा संबंध जोडण्यात आला होता. आधीच्या अभ्यासांचा अहवाल योग्य आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी नवा अभ्यास करण्यात आला.

**डोळ्यांचं आरोग्य**

## काळजी मुलांच्या डोळ्यांची



मुलांच्या डोळ्यांवर परिणाम करणारे बरेच नेत्रविकार आहेत. या नेत्रविकारांचं लवकर निदान झालं तर मुलांच्या डोळ्यांचं आरोग्य टिकून राहतं. लेझी आय, डोळे येणं, अश्रूनलिकेत अडथळे येणं किंवा अश्रूनलिका बंद होणं अशा समस्या मुलांमध्ये आढळू शकतात. त्यामुळे मुलांच्या डोळ्यांकडे पालकांनी नीट लक्ष द्यायला हवं.

**दंतारोग्य**

## अक्कलदाढ काढल्यानंतर...



अक्कलदाढ काढून टाकणं ही अगदी सर्वसामान्य बाब आहे. या प्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. या जंतूसंसर्गाची बरीच लक्षणं दिसून येतात. त्यामुळे दंततज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांचं पालन रुग्णाने करायला हवं. अक्कलदाढ काढून टाकल्यानंतर रक्तस्राव होऊ शकतो. पण लगेच चूळ भरू नये. कारण यामुळे रक्ताच्या गुठळ्या विरघळून जातील. अक्कलदाढ काढलेल्या भागात रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्या नाहीत तर त्याला ड्राय सॉकेटिस असं म्हणतात.

**आजीबाईचा बटवा**

## लवंग खाल्ल्याने...



लवंग हा भारतातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात आढळणारा पदार्थ आहे. डोकेदुखीपासून दंतविकारांपर्यंत विविध विकारांवर लवंग गुणकारी ठरते. आम्लपित्त आणि गॅसच्या समस्येवर लवंग खूप प्रभावी ठरते. लवंग चघळल्यामुळे लाळेची निर्मिती होते आणि पचनक्षमता वाढते. छातीत जळजळ होत असेल तर लवंग चघळल्याने आराम पडतो. लवंगीचा एक तुकडा तोडून चघळत राहिल्याने लवकर आराम मिळतो. आम्लपित्ताची समस्या असेल तर जेवणानंतर लवंगीचा तुकडा चघळायला हवा.

## आमच्या पक्षाचे ३८ नगराध्यक्ष
### राकाँ प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद व नगरपालिका निवडणूकीत



राष्ट्रवादी काँग्रेसने थेट ३८ नगराध्यक्ष आणि राज्यात पक्षामार्फत लढल्या गेलेल्या ३ हजार ६८१ जागांपैकी जवळपास ११०० नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ चिन्हावर अधिकृत निवडून आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार सना मलिक-शेख, प्रदेश सरचिटणीस संजय तटकरे, सुरज चव्हाण, लतिफ तांबोळी उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने व महायुतीतील भाजप - शिवसेना या मित्र पक्षांना राज्यातील जनतेने प्रचंड पाठबळ व चांगला प्रतिसाद दिला आहे. काही ठिकाणी स्वतंत्रपणे राष्ट्रवादी काँग्रेस निवडणूक लढली तर काही ठिकाणी भाजप - राष्ट्रवादी युती आणि काही ठिकाणी राष्ट्रवादी - शिवसेना अशी युती झाल्याचेही सुनिल तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

या निवडणूकांना सामोरे जाताना राष्ट्रवादी काँग्रेसने थेट ३८ नगराध्यक्ष आणि तर राज्यात एकंदरीत पक्षामार्फत लढल्या गेल्या ३ हजार ६८१ जागांवर नगरसेवक पदासाठी अधिकृत उमेदवार उभे केले होते. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ चिन्हावर १ हजार ९० म्हणजे जवळपास ११०० नगरसेवक अधिकृत घड्याळ चिन्हावर निवडून आल्याचे तटकरे यांनी सांगितले.

काही ठिकाणी स्थानिक आघाडी, काही ठिकाणी विकास आघाडी अशाही आमच्या आघाड्या झाल्या होत्या आणि यामध्येही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक आहेत ते पक्षाच्या अधिकृत आकडेवारीमध्ये धरलेले नसले तरी राज्यात झालेल्या या निवडणुकीतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला चांगला प्रतिसाद मिळालाच शिवाय ग्रामीण भागात स्ट्राईक रेट चांगला राहिला हेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष म्हणून मी व राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल व मंत्री मंडळातील आमचे सहकारी, पक्षाने नेमलेल्या स्टार प्रचारकांनीही प्रचाराची धुरा चांगल्या पध्दतीने हाताळली. आम्हाला सर्व ठिकाणी यश आलेच असे नाही परंतु हे घडत असताना प्रदीर्घ कालावधीनंतर या निवडणूकांचे जनतेत औत्सुक्य होते. पक्षाने सामुदायिक मेहनत करत टीमवर्क म्हणून आपले काम दाखवले ते वाखाणण्याजोगे होते. आता महानगरपालिकेच्या निवडणुकीचे नियोजन सुरू आहेच. शिवाय येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही अशाच पध्दतीचे नियोजन करणार आहोत, अशी माहितीही तटकरे यांनी दिली.

# ग्रामीण भागातील रोजगाराची हमी जी-रामजीने संपवली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) जागी लागू करण्यात आलेल्या व्हीबी-जीरामजी कायद्यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराची हमी संपुष्टात आली असून, ही योजना आता केंद्र सरकारच्या मर्जीवर अवलंबून राहिली आहे, असा आरोप अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते अभिषेक दत्त यांनी केला आहे.



पूर्वी ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कामाची मागणी झाल्यानंतर स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून दिला जात होता. मात्र, नव्या कायद्यानुसार कोणत्या राज्यात, कोणत्या जिल्ह्यात आणि कोणत्या गावात रोजगार द्यायचा, याचा संपूर्ण अधिकार केंद्र सरकारने स्वतःकडे घेतला आहे. त्यामुळे मागणीवर आधारित रोजगार देण्याची संकल्पनाच संपुष्टात आली असल्याचे दत्त यांनी स्पष्ट केले.

व्हीबी-जीरामजी कायद्यानुसार योजनेच्या निधीतही मोठा बदल करण्यात आला आहे. यापूर्वी केंद्र सरकारचा ९० टक्के आणि राज्य सरकारचा १० टक्के वाटा होता. आता केंद्राचा वाटा कमी करून ६० टक्के, तर राज्यांचा वाटा ४० टक्के करण्यात आला आहे. एकीकडे केंद्राने आर्थिक जबाबदारी कमी केली, तर दुसरीकडे योजनेच्या अंमलबजावणीचा पूर्ण अधिकार स्वतःकडे ठेवला असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कायद्यात शेती हंगामातील ६० दिवस रोजगार न देण्याची अट घालण्यात आली आहे. यामुळे याच कालावधीत ग्रामीण कामगारांना रोजगार मिळणार नाही आणि त्यांचे आर्थिक शोषण होण्याची शक्यता वाढणार आहे. याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील अकुशल व अर्धकुशल मजुरांवर होणार असल्याचे दत्त म्हणाले.

केंद्र सरकारने अर्थसंकल्पात या योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिलेला नाही, असा आरोपही त्यांनी केला. कायद्यात १०० दिवसांऐवजी १२५ दिवस रोजगार देण्याची तरतूद असली, तरी २०१९ ते २०२४ या कालावधीत प्रत्यक्षात केंद्र सरकारने सरासरी ४२ दिवसांपेक्षा जास्त रोजगार कोणालाही दिलेला नाही. त्यामुळे १२५ दिवस रोजगार देण्याची घोषणा ही केवळ दिशाभूल असल्याचे त्यांनी सांगितले.

जीएसटीमुळे राज्यांचे उत्पन्न घटले असून, अनेक राज्यांवर मोठ्या प्रमाणात कर्जाचा भार आहे. महाराष्ट्रावर सात लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे, तर गरीब राज्यांची स्थिती अधिकच बिकट आहे. अशा परिस्थितीत राज्यांना रोजगार निर्मितीवर खर्च करणे शक्य होणार नाही. परिणामी ग्रामीण भागातील तरुणांचे शहरांकडे स्थलांतर वाढेल, असा इशाराही दत्त यांनी दिला.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मूळ संकल्पनेलाच तडा देणारा हा कायदा असून, रोजगाराची हमी न देणारी आणि पूर्णतः केंद्राच्या नियंत्रणाखालील योजना तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

२०१३ मध्ये भाजपचे खासदार डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी न्यायालयात एक तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात पोलिसांकडे कोणतीही तक्रार किंवा एफआयआर नोंदवण्यात आलेला नव्हता. या कारणांमुळे न्यायालयाने ईडीच्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला.

भाजप व केंद्रातील मोदी सरकार गांधी कुटुंबीय आणि काँग्रेस नेत्यांचा राजकीय सूडबुद्धीने छळ करत असल्याचा आरोप अभिषेक दत्त यांनी केला.

## मला विरोधी पक्षनेते बनवायला सरकार घाबरते...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
भाजपला जिथे गरज असते, तिथे ते मित्रपक्षांना जवळ करतात. मात्र, जिथे त्यांची ताकद वाढते, तिथे माझं ते माझं आणि तुझं तेही माझं अशी त्यांची वृत्ती आहे. सध्या भाजपने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाजूला करण्याचे ठरवले आहे, मात्र शिंदे भाजपच्या दबावाखाली येतील असे वाटत नाही, असा घणाघाती आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केला. सिंधुदुर्ग जिल्हा कार्यकारणीच्या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

भास्कर जाधवांचा घणाघात



राज्यातील सत्ताधाऱ्यांवर टीका करताना भास्कर जाधव म्हणाले की, सरकारकडे पाशवी बहुमत आहे, तरीही ते मला विरोधी पक्षनेते बनवायला घाबरतात. ही भीती म्हणजे कोकणी माणसाचा आणि इथल्या कर्तृत्वाचा सन्मान आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असून, उमेदवार देताना त्याचे समाजातील स्थान आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना यांचा विचार करूनच निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रत्नागिरीतील लोटे एमआयडीसीमध्ये इटलीत बंदी घातलेले 'परमानेंट केमिकल' हे विषारी रसायन बनवले जात असल्याचा खळबळजनक दावा भास्कर जाधव यांनी यावेळी केला. हे रसायन मानवी आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पाला परवानगी दिली असली, तरी स्थानिक आणि पर्यावरण तज्ज्ञांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गेल्या काही दिवसांपासून या संदर्भात एक क्लिप समाजमाध्यमांवर फिरत असून, मी त्याची सत्यता पडताळून पाहत आहे. तथ्य आढळल्यास याविरोधात सर्वांनी एकत्र येऊन आवाज उठवला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

**विनायक राऊतांवर टिप्पणी**

खासदार विनायक राऊत यांच्या नाराजीच्या चर्चांवर बोलताना भास्कर जाधव यांनी आपल्या खास शैलीत टोला लगावला. विनायक राऊत नाराज आहेत की खुश, हे मला माहित नाही. माहिती घेऊन सांगतो, असे ते म्हणाले. तसेच, वैभव नाईक यांना एसीबीने नोटीस दिल्यानंतर घेतलेल्या सभेचा फायदा आगामी निवडणुकीत नक्कीच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्ताधारी पक्षातील काही लोक शहर विकास आघाडी करून आमच्यासोबत येत आहेत, याचा अर्थ काहीतरी चुकीचे घडत असताना समान धागा पकडून लोक एकत्र येत आहेत. दरम्यान, ₹राणे बंधूंवर मी काहीही बोलणार नाही, असे म्हणत त्यांनी या विषयावर बोलणे टाळले.

# मीरा इंडस्ट्रीजला भीषण आग
### चणाडाळसह महागडी यंत्रसामग्री जळून खाक : प्रचंड नुकसान



■ महासागर प्रतिनिधी, चांदुर रेल्वे, दि. २३ :
चांदूर रेल्वे शहरालगतच्या कुऱ्हा रोडवरील एमआयडीसी परिसरातील मीरा इंडस्ट्रीज या चणाडाळ प्रक्रिया करणाऱ्या मोठ्या मिलमध्ये मंगळवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत मोठ्या प्रमाणात चणाडाळ, चणा, कुटार तसेच मिलमधील महागडी यंत्रसामग्री जळून खाक झाली असून उद्योगाला मोठ्या आर्थिक नुकसानीचा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मीरा इंडस्ट्रीजमध्ये दररोज सुमारे ७० टन चण्यावर प्रक्रिया करून चणाडाळ निर्मिती केली जाते. जवळपास दोन ते अडीच एकर परिसरात पसरलेली ही इंडस्ट्री तीन मजली इमारतीत कार्यरत असून, त्यामुळे आगीचे स्वरूप अधिकच भीषण झाले.

आगीचे प्राथमिक कारण शॉर्टसर्किट असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सोमवार रोजी रात्री दहापर्यंत मिलमध्ये नियमित कामकाज सुरू होते. काम संपल्यानंतर मजूर व मालक घरी निघून गेले होते, मात्र काही मजूर मिल परिसरातील निवासस्थानी झोपले होते. थंडीचे दिवस आणि मध्यरात्र असल्यामुळे आग नेमकी केव्हा लागली याची कोणालाही चाहूल लागली नाही.

मंगळवारी सकाळी मिलमधून धूर निघत असल्याचे लक्षात येताच मालक पियुष गंगन व सचिन गंगन यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली. तात्काळ मिलचे शटर उघडताच आत अग्नीचे रौद्र रूप पाहायला मिळाले आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले.

**अग्निशामक दलाचे अथक प्रयत्न**

आगीची माहिती मिळताच चांदूर रेल्वे, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर, तिवसा व अमरावती येथील अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. चांदूर रेल्वे येथील पंपिंग स्टेशनमधून अंदाजे ३० ते ३५ फेऱ्या मारत पाण्याचा मारा करण्यात आला. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५ पर्यंतच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर अखेर आगीवर पुर्णतः नियंत्रण मिळवण्यात अग्निशामक दलाला यश आले.

या मोहिमेत अग्निशामक विभागाचे प्रमुख अमोल भुजाडे, न.प. लिपीक जितू कर्से, कर्मचारी पंकज इमले, वाहन चालक अमोल कडू, फायरमन निरज दुबे, मयूर घोडेस्वार यांच्यासह अमरावती, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर व तिवसा येथील कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व तरुणांनीही घटनास्थळी धाव घेत मदतीचा हात पुढे केला. नागरिकांच्या सहकार्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र मिलमधील कच्चा माल, तयार चणाडाळ साठा, विद्युत यंत्रणा व इतर साहित्य जळून खाक झाल्याने उद्योगाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. आगीमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, नुकसानीचा पंचनामा सुरू आहे.

## डिजिटल व्यक्तिचित्रांचा विश्वविक्रमवीर प्रणव सातभाई



लोकमानस

जिटल पोर्ट्रेट्स अर्थातच डिजिटल व्यक्तिचित्र म्हटले की, चटकन डोळ्यासमोर नाशिकच्या प्रणव सातभाईचे नाव येते. प्रणवचा फोटोग्राफीच्या आवडीतून निर्माण झालेला प्रवास हा जागतिक विक्रम प्रस्थापित करणारा डिजिटल व्यक्तिचित्र कलाकार ते मोटिव्हेशनल स्पीकरपर्यंत येऊन पोहोचला आहे.

प्रणवची जडणघडण नाशिकच्या निफाडमधील वनसगाव येथे अगदी साध्या आणि ग्रामसंस्कृती लाभलेल्या वातावरणात झाली.लहानपणापासून गावाकडे वाढलेल्या प्रणवला निसगार्ची, निसर्गातील रंगसंगतीची ओढ आणि वेड होते. प्रणवचे वडील, आजी-आजोबा तिघेही वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने कुटुंबाला वैद्यकीय वारसा लाभला होता आणि शिवाय त्याची आईदेखील उच्चशिक्षित आहे.

साहजिकच आपल्या कुटुंबाचा वारसा प्रणवने पुढे न्यावा, वैद्यकीय शिक्षणासाठी लागणारी प्रवेश परीक्षा द्यावी, अशी त्याच्या आई-वडिलांची इच्छा होती. त्यामुळे त्याने घरच्यांच्या इच्छेखातर ११-१२ वीसाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला खरा; पण प्रणवला महाविद्यालयात शिकत असताना करीअरची वेगळी अशी फोटोग्राफीची वाट निवडावीशी वाटत होती.

अर्थातच त्याच्या आई-वडिलांना मान्य नसले तरी, शेवटी प्रणवने हट्टाने आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी आई-वडिलांकडून संपूर्ण एक वर्ष आणि एक चांगल्यातला कॅमेरा मागून घेतला. या एका वर्षात त्याने एकीकडे निसगार्ची आवड असल्याने वाइल्ड लाइफ फोटोग्राफी सुरू केली. दरम्यान त्याने कुटुंबाचा विरोध पत्करत नाशिकच्या केटीएचएम महाविद्यालयात मास मीडियाच्या पदवीसाठी प्रवेश घेतला आणि त्याच दरम्यान जगभरात कोरोनाचे सावट आले. लॉकडाऊनमुळे प्रणवची फोटोग्राफी बंद झाली.

रिकामपणामुळे त्याला नैराश्य येण्यास सुरुवात झाली. या काळात तो मग त्याने काढलेले फोटो, नातेवाईकांचे फोटो एडिट करू लागला. यातून त्याला आनंद तर मिळू लागलाच, शिवाय आणखी वेगवेगळे तंत्र शिकण्याची ऊर्मी निर्माण झाली. यासाठी त्याने यूट्यूब, गूगलसारख्या साधनांचा वापर करत माहिती घेण्याचा प्रयत्न केला. यात त्याला डिजिटल पोर्ट्रेट्स या डिजिटल कला प्रकाराची माहिती मिळाली. या लॉकडाऊनच्या काळातच त्याने ही कला आत्मसात करून रोज एकेक पोर्ट्रेट्स फेसबुकच्या सामाजिक माध्यमावर टाकण्यास सुरुवात केली. एकदा असेच पहाटेपर्यंत जागून अभिनेते नाना पाटेकर यांचे व्यक्तिचित्र तयार करून पोस्ट करून दिले आणि दस्तुरखुद्द नानांनी देखील त्याचे कौतुक केले.

प्रणवने अवघ्या वर्षभराच्या आतच एक हजार व्यक्तिचित्रांचा टप्पा गाठला.ह्यप्रणवच्या पोर्ट्रेट्सची आजवर नाशिक-पुणे-ठाणे येथे एकूण पाच प्रदर्शने झाली आहेत. ह्यवर्ल्ड वाइड बुक ऑफ रेकॉर्डह्नने त्याची नोंद घेतल्याने अवघ्या एकविसाव्या वर्षी तो विक्रमवीर ठरला आहे.

आजच्या घडीस प्रणवला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून त्याचा प्रवास मांडण्यासाठी बोलावणे येत आहे. त्यातून कला शिक्षणाचे, कलेतल्या करीअरचे, सोशल मीडियाचे महत्त्व पटवून देत मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून कार्य करत आहे.

आजवर गजानन महाराज, स्वामी समर्थ महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, श्रीनिवास खळे, बाबासाहेब पुरंदरे, प्रशांत दामले, दिलीप प्रभावळकर, माधुरी दीक्षित, अमिताभ बच्चन, स्मिता पाटील, महेंद्रसिंग धोनी, सचिन तेंडुलकर यांसारख्या अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांचे, कलाकार, खेळाडू आणि इतर ऑर्डरचे पोर्ट्रेट यांसह १६०० हून अधिक पोर्ट्रेट्स साकारले आहेत. त्यामुळेच, जिद्द आणि चिकाटी धरून तुम्हाला हवं ते करा, कामाप्रति समर्पण भावना बाळगा. यश नक्कीच मिळते. ■ ■

## अनंता क्वेस्टचा भव्य शुभारंभ




अनंता क्वेस्टने अलीकडेच मुंबई येथे आपला पहिला एकदिवसीय लाइफ स्ट्रॅटेजी कन्व्हेन्शन आयोजित केला. या कार्यक्रमात ३५० हून अधिक सहभागींसह वेलनेस, वेल्थ मॅनेजमेंट, भावनिक आरोग्य, परफॉर्मन्स कोचिंग, उद्देशपूर्ण जीवनशैली आणि डिजिटल सुरक्षितता या क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ सहभागी झाले.

भारतातील ५०-६५ वयोगटासाठी खास तयार करण्यात आलेल्या या कन्व्हेन्शनचा उद्देश सहभागींच्या आयुष्याच्या पुढील टप्प्याकडे स्पष्टतेने पाहण्यास, स्वतःशी पुन्हा संरेखन करण्यास आणि पुढील वाटचालीची दिशा ठरविण्यास मदत करणे हा होता. अनुभवाधारित सत्रे, तज्ज्ञ संवाद आणि मार्गदर्शक फ्रेमवर्क्सच्या माध्यमातून सहभागींच्या आयुष्यातील उद्देश, आरोग्य, आर्थिक तयारी, नातेसंबंध आणि दीर्घकालीन कल्याण यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या दिवसभराच्या कार्यक्रमात अशिष विद्यार्थी, श्यामल वल्लभजी, डॉ. भाविन जांखारिया, अकांक्षा श्रीवास्तव, डॉ. आदित्य नायर, दीपा सोमन, डॉ. रेनुका आणि डॉ. अनिल ब्राडू यांच्यासह वेल्थ, इस्टेट प्लॅनिंग आणि सीनियर लिव्हिंग क्षेत्रातील अनेक प्रमुख व्यक्तींनी आपले विचार मांडले. स्वतःच्या वैयक्तिक करिअरमधील बदलांबद्दल आणि सततच्या विकासाबद्दल बोलताना अभिनेता आणि मोटिवेशनल स्पीकर अशिष विद्यार्थी म्हणाले, मी पिक्चर अभी बाकी है या विचारावर मनापासून विश्वास ठेवतो—कारण पुढे काय आहे याबद्दलची चिंता आपण सगळेच अनुभवतो. आज अनंता क्वेस्टमध्ये विविध पार्श्वभूमीतील इतक्या लोकांना भेटून, जे समान प्रश्न आणि आशा घेऊन येथे एकत्र आले होते, मला पुन्हा एकदा जाणवले की मी एकटा नाही. जेव्हा स्पष्टता आणि समुदाय एकत्र येतात, तेव्हा काहीतरी खूप प्रभावी घडते. आपण सगळे मिळून आपल्या आयुष्याच्या दुसऱ्या टप्प्यालाही पहिल्यासारखेच अर्थपूर्ण आणि सुंदर बनवू शकतो. ■ ■

### ..असा लागला शोध गरम पाण्यासाठीचे हिटर



हिटर (उष्णता निर्माण करणारे उपकरण) चा शोध एका व्यक्तीने लावलेला नाही, तर अनेक अभियंत्यांनी आणि शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या टप्प्यांवर यात सुधारणा केल्या आहेत. जसे की हीट एक्सचेंजरचा विकास १९व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला, पण आधुनिक इलेक्ट्रिक हिटर आणि त्यांचे तंत्रज्ञान अनेक संशोधकांनी मिळून विकसित केले, त्यामुळे 'एकाच' व्यक्तीचे नाव घेणे कठीण आहे, पण ही एक सामूहिक उत्क्रांती आहे. आधुनिक हीट एक्सचेंजरचे पहिले पेटंट १८०० च्या दशकाच्या उत्तरार्धात आले. विजेचा वापर करून उष्णता निर्माण करण्याचे तंत्रज्ञान हळूहळू विकसित झाले, ज्यात अनेक शोधकांनी योगदान दिले. सौर ऊर्जेचा वापर करून पाणी गरम करण्याच्या संकल्पनेतही अनेक बदल झाले आहेत, ज्यात वेगवेगळ्या संशोधकांचा सहभाग आहे. थोडक्यात, हिटरचा शोध एका व्यक्तीने लावला नसून, वेगवेगळ्या प्रकारच्या हीटर्सच्या विकासात अनेक संशोधकांनी योगदान दिले आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## सत्तेच्या गैवापरामुळे युतीचा विजय...

■ महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. २३ :
महाराष्ट्र राज्यात नुकतेच पार पडलेल्या नगरपरिषद व नगर पंचायतींच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपा, शिंदे



गट आणि राकाँ अजित पवार गटाने धनशक्ती, सत्तेचा वापर करून विजय मिळविल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. या उलट भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वतःची ताकद अन जनतेच्या पाठबळावर निवडणुका लढविल्या, असे ते म्हणाले.

## निवडणुकीत ब्लॅक मनीवर करडी नजर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
आगामी महापालिका निवडणुकांमध्ये काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी आयकर विभागाने पाऊल उचलले आहे. विभागाने नागपूरमध्ये २४ तास कार्यरत असलेला नियंत्रण कक्ष आणि तक्रार हाताळणी केंद्र स्थापन केले आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, जनतेकडून तक्रारी स्वीकारण्यासाठी टोल फ्री क्रमांकही सुरू करण्यात आले आहेत. नागपूरमध्ये संशयास्पद स्थितीत मोठ्या प्रमाणात रक्कम किंवा वस्तू नेताना आढळल्यास नागरिक ०२२-२२६३५५११, २२६२७२७५ आणि १८००-०२२-०११५ (टोल फ्री) या क्रमांकांवर तक्रार करू शकतात.

अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यानंतर, आयकर विभागाकडून संबंधित प्रकरणाची आयकर कायद्यातील तरतुदींनुसार चौकशी केली जाईल. जर संबंधित व्यक्ती समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकली नाही, तर तिच्याकडील रक्कम किंवा वस्तू जप्त केली जाईल. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रक्कम किंवा वस्तू सोबत घेऊन जाताना अनावश्यक गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, ओळखपत्र आणि पॅनकार्ड सोबत ठेवावे, असे आवाहन आयकर विभागाने केले आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसाठी सेमिनेरी हिल्स परिसरातील प्रधान आयकर विभागातर्फे (अन्वेषण) १८००-२३३-०३५५ आणि १८००-२३३-०३५६ हे टोल फ्री क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. काळ्या पैशाच्या वापराशी संबंधित छायाचित्रे, ध्वनीचित्रफित किंवा ध्वनीफित यांसारखे पुरावे ९४०३३-९०९८० या भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठवता येतील. रोख रकमेचे वाटप किंवा वाहतूक करण्यासंबंधीची माहिती मिळाल्यास ती विभागातर्फे देण्यात यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल.

## नागपूर परिवर्तन मोर्चा टक्कर देण्यास सज्ज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
नागपूर महापालिका निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांना पर्याय देण्यासाठी नागपूर परिवर्तन मोर्चाची बांधणी करण्यात आली. त्यात विविध १७ पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढणार आहे, अशी घोषणा विविध पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत केली.

मोर्चात समाविष्ट पक्षांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार), बहुजन रिपब्लिकन एकता मंच, प्रहार संघटना, जय विदर्भ पार्टी, आजाद समाज पार्टी, देश जनहित पार्टी, संयुक्त रिपब्लिकन पार्टी, केंद्रीय ग्रामसभा, वेलफेअर पार्टी ऑफ इंडिया, संयुक्त रिपब्लिकन आघाडी, ओबीसी बहुजन आघाडी, फॉरवर्ड ब्लॉक, रिपब्लिकन लोकशाही मोर्चा, कास्ट्राईब संघटना रिपब्लिकन पार्टी ऑफ (खोरीपा), कुणबी सेना, आणि नाग विदर्भ आंदोलन समितीचा समावेश आहे.

## हेलिकॉप्टरद्वारे पेंचमधील वाघिणीचे राजस्थानला स्थलांतर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्रप्रकल्पातून राजस्थानमध्ये पहिल्यांदाच एका वाघिणीचे स्थलांतर करण्यात आले आहे. पीएन-२२४ अशी ओळख असलेल्या या तीन वर्षांच्या वाघिणीचे राजस्थानातील रामगढ विषधारी व्याघ्र प्रकल्पात स्थलांतरित करण्याची मोहीम यशस्वीरीत्या पार पडली. भारतीय हवाई दलाच्या हेलिकॉप्टरद्वारे स्थलांतर करण्यात आले.



एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाघांच्या संवर्धनासाठी तसेच वाघांच्या जनुकीय विविधतेत वाढ करण्यासाठी सुरू असलेल्या व्यापक योजनेतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. जयपूरहून वाघिणीला रस्तेमार्गे राजस्थानमधील रामगढ विषधारी व्याघ्रप्रकल्प (बुंदी) येथे नेण्यात आले. सुमारे अडीच तासांचा हा हवाई प्रवास होता. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, दोन राज्यांदरम्यान हेलिकॉप्टरद्वारे वाघिणीचे स्थलांतर होण्याची ही देशातील पहिलीच घटना आहे.

ही वाघिण दाट झाडीत ती विश्रांती घेत असताना आढळून आली. पशुवैद्यकीय डॉक्टरांनी तिला यशस्वीरीत्या ताब्यात घेतले. एक तासांच्या प्रक्रियेनंतर दुपारी चार वाजून ५५ मिनिटांनी तिला हेलिकॉप्टरने उचलण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव वाघिणीला थेट बुंदीऐवजी जयपूर येथे आणण्यात आले. त्यानंतर तिला रामगढ अभयारण्यात बजालिया एनक्लोजर मध्ये ठेवण्यात आले आहे.

मूळ आराखड्यानुसार वाघिणीला १० डिसेंबरला स्थलांतरित करायचे होते, मात्र सहा डिसेंबरला तिची रेडिओ कॉलर तुटल्याने ही प्रक्रिया थांबवावी लागली. सुरुवातीला वाघिणीला थेट पेंचमधून रामगढला नेण्याची योजना होती. भारतीय हवाई दलाने सुरक्षेच्या कारणास्तव परवानगी नाकारल्याने संपूर्ण आराखडा बदलावा लागला. त्यामुळे जयपूरमार्गे स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला.